# अर्थबोधपत्रिका

(आर्थिक, सामाजिक विषयांवरील विविध माहिती पोचविणारे माध्यम)

अंक १२ नोव्हेंबर-डिसेंबर २०००

- विकासाच्या बदलत्या संकल्पना
- व्यापारासाठी विविधतेचा बळी?
- व्यापाराधारित अर्थव्यवस्था
- आर्थिक प्रादेशिकवाद
- बालपण नसलेली मुले
- नव्या शतकातील नवकल्पना

**भारतीय अर्थविज्ञानवर्धिनी**

(केवळ खाजगी वितरणासाठी)

## अर्थबोधपत्रिकेविषयी

भारतीय अर्थविज्ञानवर्धिनी या संस्थेतर्फे "अर्थबोधपत्रिका" हे आर्थिक, सामाजिक, व राजकीय विषयांवरील माहितीपूर्ण लेख देणारे प्रकाशन, नोव्हेंबर १९९८ पासून प्रकाशित करण्यात येत आहे. सर्वसामान्य मराठी वाचकांना विविध विषयांवर अभ्यासपूर्ण माहिती देणे, एखाद्या विषयाच्या सर्व बाजू निष्पक्षपणे मांडणे, तसेच विविध समस्यांच्या संदर्भातील सैद्धांतिक व संकल्पनात्मक बाबी सोप्या शब्दांत देणे, हे या पत्रिकेचे उद्देश आहेत. विशेषतः अनेक विषयांवरील सखोल माहिती व सैद्धांतिक बैठक असणारे विश्लेषणात्मक लेख छापणारी जी राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावरची इंग्रजी भाषेतील नियतकालिके व पुस्तके आहेत, व ज्यांतील माहिती एरवी मराठी वाचकांपर्यंत सहजतेने पोचत नाही, अशी माहिती मराठी वाचकांपर्यंत पोचविण्याचा आमचा प्रयत्न आहे.

जानेवारी २००० पासून अर्थबोधपत्रिकेचे दुसरे वर्ष सुरू झाले असून दुसऱ्या वर्षाचा हा सहावा व शेवटचा अंक आहे. सलग क्रमांकानुसार हा बारावा अंक आहे.

नव्या वर्षाचे सहा अंक मिळविण्यासाठी देणगीमूल्य रुपये ५०/- (रुपये पन्नास फक्त) डिमांड ड्राफ्टने / मनीऑर्डरने / पोस्टल ऑर्डरने / रोख पाठवावे. त्याबरोबर नाव व पूर्ण पत्ता पाठवावा. यासंबंधीचा अर्ज अंकात शेवटच्या पानावर देण्यात आला आहे.

**अर्थबोधपत्रिका : अंक १२ : नोव्हेंबर-डिसेंबर २०००**

**संपादक** : रमेश पानसे - **संपादन सहाय्यक** - राज्यश्री क्षीरसागर

**प्रकाशक** : भारतीय अर्थविज्ञानवर्धिनी, 'अर्थबोध', ९६८/२१-२२, सेनापती बापट मार्ग, पुणे - ४११ ०१६.

**मुद्रक** : एस. के. प्रिंटर्स, परज अपार्टमेंट, २०५ शनिवार पेठ, पुणे - ४११ ०३०.

**पत्रव्यवहारासाठी पत्ता :** संपादक, अर्थबोधपत्रिका, 'अर्थबोध', ९६८/२१-२२, सेनापती बापट मार्ग, पुणे ४११ ०१६.

फोन: ५६५७१३२ / ५६५७२१०    ई-मेल : ispe@vsnl.com

# अनुक्रमणिका


| | | |
|---|---|---|
| | संपादकीय | ३ |
| १. | विकासाच्या बदलत्या संकल्पना | ४ |
| २. | व्यापारी संस्कृतीसाठी विविधतेचा बळी | ११ |
| ३. | व्यापाराधारित अर्थव्यवस्था धोक्याची ? | १६ |
| ४ | पूर्व आशियातील आर्थिक प्रादेशिकवाद | २२ |
| ५. | बालपण नसलेली मुले | २८ |
| ६. | नव्या शतकातील नव्या कल्पना | ३२ |


**सूचना**

- अर्थबोधपत्रिकेच्या सहा अंकांचे देणगीमूल्य रुपये ५०/- (पन्नास रुपये फक्त) डिमांड ड्राफ्टने / मनीऑर्डरने / पोस्टल ऑर्डरने / रोख पाठवावे. त्याबरोबर नाव व पूर्ण पत्ता पाठवावा. यासंबंधीचा अर्ज अंकाच्या शेवटी दिलेला आहे. कोणत्याही अंकापासून सभासद होता येते.

- या अंकातील मजकुराबाबत आपण आपल्या सूचना आणि/किंवा अभिप्राय संस्थेच्या पत्यावर पाठवावेत अशी आपणास विनंती आहे.

- अंकातील मजकूर आपण आपल्या नियतकालिकात / वृत्तपत्रात प्रसिद्ध करू शकता. फक्त लेख प्रसिद्ध केल्यावर 'अर्थबोधपत्रिका, भारतीय अर्थविज्ञानवर्धिनीच्या सौजन्याने' अशी ओळ प्रसिद्ध करावी एवढीच अपेक्षा आहे.

- लेख प्रसिद्ध झाल्यावर संस्थेतर्फे कोणतेही मूल्य आकारण्यात येणार नाही. मात्र लेख प्रसिद्ध केलेला अंक संस्थेला पाठवावा ही अपेक्षा आहे.

## वाचकांचा प्रतिसाद

**अर्थबोधपत्रिकेचा** मी एक वर्गणीदार व वाचक आहे. आपल्या सप्टेंबर-ऑक्टोबर २०००च्या अंकातील "जागतिकीकरणाकडून पर्यायी व्यवस्थेकडे" या लेखासंबंधीची प्रतिक्रिया व्यक्त करीत आहे.

जागतिकीकरण अटळ आहे यापेक्षा जागतिकीकरण स्वाभाविक, नैसर्गिक आहे. ती वाढ आहे, तो एक विकास आहे. जंगलात टोळ्या करून राहणे, शेती करणे, ग्रामे व मग छोटी राज्ये, वांशिक (ethnic) कुल राज्यातून मोठी राज्ये व राष्ट्रे हा इतिहासाचा क्रम आहे. सध्याच्या औद्योगिक रचनेने या प्रवासाला वेग दिला. भांडवली युगाने प्रादेशिक राष्ट्रांच्या व पुढे मोठ्या राष्ट्रांच्या मर्यादा मोडल्या. ब्रिटनसारख्या राष्ट्रांची साम्राज्यशाही वाढणे, हे जागतिकीकरणच होते. तोच क्रम पुढे वेगाने चालू आहे. त्यात वाईट तरी काय आहे व नवीन तरी काय आहे?

वाईट आहे तो समाजातील अन्याय, मागास राष्ट्रांवर होणारा अन्याय, व भौतिक / सांस्कृतिक विषमता. पण याचा जागतिकीकरणाशी काय संबंध आहे? त्याचा संबंध आहे तो फक्त वर्गीय व शोषक रचनेशी, पिळणारे व पिळले जाणारे, साम्राज्यवादी राष्ट्रे व गुलाम राष्ट्रे, वरची व खालची जात इत्यादिंशी.

सामुदायिक व्यवहारातून आदिमानव विविध वस्तूंचे उत्पादन करू लागला व स्थिर, शेती-आधारित समाज निर्माण करू लागला, अधिकाधिक सुसंस्कृत होऊ लागला, त्याचवेळी समाजात वरीलप्रमाणे वर्ग निर्माण झाले. तेव्हाच माणसाने माणसावर अन्याय करण्यास, माणसाने माणसास छळण्यास -लुबाडण्यास, हीन लेखण्यास प्रारंभ झाला. शंबुकाचे वध सुरू झाले व एकलव्याचे अंगठे कापले जाऊ लागले. कुल राज्ये संपून, पूर्ण सरंजामी सूरू झाली, तेव्हा मुंडकी उडविण्यास व ती तलवारीच्या टोकास लटकविण्यास प्रारंभ झाला. त्यानंतर खूप पुढे औद्योगिक साम्राज्यवाद्यांनी हेच अन्याय चालू ठेवले. या सर्व गोष्टी जणू काही गेल्या ५० वर्षात व 'जागतिकीकरणा'च्या काळात सुरू झाल्या, असे म्हणणे योग्य नव्हे. वर्गभेद, जातिभेद व अशाच विविध उच्च नीच भेदांमुळे होणारे अन्याय जागतिकीकरणाच्या काळातही चालू आहेत. पूर्वी ज्याप्रमाणे या अन्याय-विषमता याविरूद्ध लढून समाजाने प्रगती साधली, तशी प्रगती साधण्याची गरज आजही आहे. जागतिकीकरणाच्या स्वाभाविक क्रमात

(कृपया पान क्र. ३७ वर पाहा)

# संपादकीय

नोव्हेंबर-डिसेंबर महिन्यांचा .हा अंक, .या वर्षाचा शेवटचा अंक आहे. पुढील अंक १ जानेवारी २००१ या नववर्षदिनी प्रसिद्ध होईल.

गेल्या वर्षभरात, अर्थबोधपत्रिकेच्या उपक्रमाला वाचकांचा बऱ्यापैकी प्रतिसाद मिळाला, त्यातून वाचकांच्या अपेक्षांचाही काही अंदाज आम्हाला घेता आला. हे द्वैमासिक काही विशिष्ट हेतू धरून सुरू करण्यात आले आहे. अनेक राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय स्तरांवरील मासिकांतून, विविध नवनवीन ग्रंथातून आणि अहवालांतून खूप उपयुक्त माहिती येत असते; नव्या संकल्पना पुढे येत असतात, नवे विचारप्रवाह दिसू लागतात. आणि या सर्व बाबी कळत नकळत आपल्या दैनंदिन जीवनावरही प्रभाव पाडत असतात. अशावेळी या गोष्टींचा वेध घेऊन, त्या समजावून घ्याव्यात, त्यांचा आपल्या जीवनाशी संबंधित अशा धाग्या-दोऱ्यांचा उलगडा करावा आणि तो मराठी वाचकांसमोर मांडावा अशी भूमिका घेऊन अर्थबोधपत्रिका प्रकाशित होत असते.

गेल्या वर्षभरात प्रसिद्ध झालेल्या सहा अंकामध्ये एकूण ४१ लेख प्रसिद्ध करण्यात आले. त्यापैकी राजकीय विषयांवरील सात, शिक्षणविषयक आठ, आर्थिक विषयांवर दहा आणि सामाजिक स्वरूपाचे असे तेरा लेख प्रसिद्ध करण्यात आले. याव्यतिरिक्त अन्य विषयांवरचे तीन लेख आणि वाचकांचे विविध प्रतिसादही प्रसिद्ध करण्यात आले. विषयांमध्ये विविधता आणि विवेचनात सोपेपणा आणण्याचा आमचा प्रयत्न होता. वास्तविक विविध विषयांवर इतके महत्त्वाचे वाङ्मय प्रसिध्द होत असते की आम्हालाही निवड करणे कठीण होऊन बसते. अशावेळी, जे इतर वृत्तपत्रे, मासिकांतून सहजपणे प्रसिद्ध होत नाही, ते या ठिकाणी प्रसिद्ध करण्याचा आमचा प्रयत्न असतो.

या अंकात असेच काही अतिशय महत्त्वाचे लेख दिले आहेत. गेल्या अर्धदशकातील 'बदलत्या विकास-संकल्पनां'चा जसा आढावा घेतला आहे, तसाच पुढील शतकाच्या संदर्भातील गंभीर नि गंमतीदार अपेक्षांचाही आलेख येथे दिला आहे. '.युनिसेफ'चे बालकांविषयीचे दोन अहवाल आपले डोळे उघडविणारे आणि कान बंद करायला लावणारे आहेत. या विषयाचे गांभीर्य वाचकांना जाणवून ते त्यांना कृतिशील करेल अशी आम्हाला आशा आहे. गेल्या दशकातील - नव्या आर्थिक धोरणाच्या कारकीर्दीतील व्यापाराचे, दृष्य-अदृष्य परिणाम, आणि आर्थिक प्रादेशिकवाद असे विषय काही लेखांतून मांडण्यात आले आहेत. वाचकांना हे प्रयत्न रूचतील अशी आम्हास आशा आहे.

# विकासाच्या बदलत्या संकल्पना

आंतरराष्ट्रीय श्रम संघटनेचे तत्कालीन कार्यकारिणाचे एक सदस्य विल्फ्रेड बेनसर यांनी १९४२ साली 'अल्पविकसित प्रदेश' असा शब्दप्रयोग आपल्या लिखाणात केला होता. तो बहुधा 'अल्पविकसित' या शब्दाचा पहिला वापर असावा. पुढे १९४४मध्ये रोझेन्स्टिन रोडन यांनी 'आर्थिकदृष्ट्या मागासलेले प्रदेश' असा उल्लेख केलेला आहे. त्याचवर्षी आर्थर लेवीस यांनी 'श्रीमंत व गरीब देश' यांमधील अंतराचा उल्लेख आपल्या लेखनात केला. पुढच्या दशकभरात, संयुक्त राष्ट्रसंघाच्या वाङ्मयात अधूनमधून अलपविकसिततेचा उल्लेख येत गेला. मात्र ठळक उल्लेख आढळतो तो, अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष ट्रूमन यांनी जेव्हा २० जून १९४७ला राष्ट्राध्यक्षपदाची सूत्रे हाती घेतली, तेव्हा दिलेल्या अभिभाषणात. त्यात त्यांनी दक्षिण गोलार्धाचा उल्लेख 'अल्पविकसित विभाग' असा केला होता आणि खाडकन् एकदम जगातील २० कोटी जनता 'अविकसित' ठरली, आणि अमेरिकन जनता ठरली 'विकसित'. तेव्हापासून विकास या संकल्पनेचीच कारकीर्द सुरू झाली असे मानले जाते. जगात विकसित आणि अल्पविकसित (किंवा अविकसित, विकसनशील, गरीब, मागासलेली अशा पर्यायी संज्ञांनी उल्लेख होणारी) राष्ट्रे असा भेद करणे सुरू झाले. आणि या राष्ट्रांची नैसर्गिक वैविध्याने समृध्द असलेली, स्वतःची खास वैशिष्ट्ये असलेली प्रतिमा जाऊन त्यांना कमीपणा देणारी, त्यांची मानहानी करणारी अशी त्यांची नवी प्रतिमा केवळ एकाच शब्दाने निर्माण करण्यात आली, अल्पविकसित, अविकसित राष्ट्रे !

गेले अर्धशतक हे 'विकासाचे युग' मानले गेले. या काळाचा नि त्यांच्या संदर्भात विकास या संकल्पनेचाच अंतर्बाह्य वेध घेण्याचे काम एका अलिकडच्या ग्रंथात विस्ताराने केले आहे. 'द डेव्हलपमेंट डिक्शनरी - ए गाईड टू नॉलेज अँज पॉवर' या वोलफँग सॅक्स यांनी संपादित केलेल्या ग्रंथात* बाजार, गरजा, उत्पादन साधने, सहभाग, नियोजन, समता, पर्यावरण, गरिबी. समाजवाद, राज्य, तंत्रज्ञान अशा विकासाच्या संदर्भातील काही मूलभूत संकल्पनांचे विश्लेषण मान्यवर तज्ज्ञांनी केलेले आहे. प्रत्येक संकल्पना ही ऐतिहासिक आणि वांशिक

* प्रकाशक - ओरिएंट लॉगमन लिमिटेड (१९९७)३-६-२७२ हिमायतनगर, आंध्र प्रदेश

दृष्टिकोणातून तपासून त्यातील पूर्वग्रह स्पष्ट केले आहेत. गेल्या अर्धशतकातील 'विकास' नामक संकल्पनेलाच वैचारिक आव्हान देण्याचा प्रयत्न या ग्रंथाने केला आहे. ग्रंथातील पहिल्याच 'विकास' यावरील लेखात, गुस्तावो इस्टेवा (हे गृहस्थ मेक्सिकोच्या नियोजन खात्यात काम करीत होते, पुढे ते प्रत्यक्ष गावविकासाच्या चळवळीत उतरले. ते स्वतःला 'अव्यावसायिक बुद्धीवादी' म्हणवून घेतात.) यांनी विकासाचा गेल्या अर्धशतकाचा इतिहास दिला आहे. परंतु त्यापुर्वी त्यांनी मांडलेला मुद्दा खूपच महत्त्वाचा आहे. ते म्हणतात, जगातील जवळजवळ दोन-तृतीयांश लोकसंख्येच्या बाबतीत असे घडते आहे, की जेव्हा जेव्हा कोणत्याही प्रकारे विकासाचा विचार मनात आणतात, तेव्हा तेव्हा प्रथमतः त्यांना 'आपण अविकसित आहोत' अशा त-हेची स्वतःची प्रतिमा डोळ्यासमोर ठेवावी लागते; आणि त्याबरोबर, अर्थातच, 'अविकसित' या संकल्पनेबरोबर येणारी ओझीदेखील. उदाहरणार्थ, आयुष्यभर सोसावी लागणारी दुय्यमतेची जाणीव, कुठेतरी घसरल्याची जाणीव, पराभवाची टोचणी आणि कायम केला जाणारा फरक. परिणामतः स्वतःवरचा आणि स्वतःच्या संस्कृतीवरचा विश्वासच ढळायला लागतो.

**आर्थिक वृद्धी**

'विकासा'ची सुरूवातीची संकल्पना अतिशय संकुचित अशी, केवळ 'आर्थिक वृद्धी'ची होती. अल्पविकसित राष्ट्रांचा विकास करायचा म्हणजे काय? तर दरडोई उत्पन्नाची पातळी वाढवायची. लेवीस यांनी १९४४मध्ये हे उद्दिष्ट मांडले आणि १९४७च्या युनोच्या जाहीरनाम्यात त्याचा उल्लेख करण्यात आला. परंतु लेविसने स्पष्टच म्हटले होते की "आपला विषय आर्थिकवृद्धी हाच आहे, त्याच्या वाटणीबाबतचा नाही". डाव्या विचारांच्या पॉल बारान यांनी १९५७मध्ये व्याख्या करताना, 'भौतिक वस्तूंचे दरडोई उत्पादन' असा 'विकास' या संकल्पनेचा अर्थ लावला होता. वॉल्टर रोस्टोव्ह यांचा 'नॉन-कम्युनिस्ट मॅनिफेस्टो' १९६०मध्ये प्रसिद्ध झाला. त्यांनी आर्थिक विकासाच्या पायऱ्या सांगताना, दरडोई उत्पादनाचाच निकष हा एकमेव महत्त्वाचा निकष म्हणून मांडला होता. याचा अर्थ असा की १९५०च्या दशकात जसे औद्योगिक विकासाच्या कल्पनेचे वारे होते तसेच ते स्थूल राष्ट्रीय उत्पादनातील वाढीचे होते व विकास म्हणजे भौतिकवृद्धी हीच कल्पना सर्वत्र पसरली होती. राष्ट्रसंघाचे (युनोचे) जागतिक सामाजिक स्थितीविषयक अहवाल १९५२ पासूनच प्रसिद्ध होऊ लागले होते. त्यात पुढे 'सामाजिक विकास' या शब्दद्वयाचा वापर सुरू झाला. या संज्ञेचा वापर 'सामाजिक स्थिती' या संज्ञेत गतिमानता आणण्यासाठी आणि 'आर्थिक विकास' या संज्ञेशी सहयोगी म्हणून सुरू

झाला. १९६२ साली राष्ट्रसंघाचे आर्थिक व सामाजिक कौन्सिल (इकोसॉक) निर्माण झाले आणि त्याने 'आर्थिक विकास' आणि 'सामाजिक विकास' या विकासाच्या दोन्ही अंगांच्या एकत्रीकरणाची सूचना केली.

याचवेळी राष्ट्रसंघाने १९६०-७० हे पहिले 'विकास दशक' म्हणून जाहीर केले. त्याच्या कृतीआराखड्यात असे म्हटले की, "अल्पविकसित राष्ट्रांचा प्रश्न हा केवळ वृद्धीचा नाही, तर तो विकासाचा आहे....विकास म्हणजे वृद्धी अधिक बदल". 'बदल' ही संकल्पना स्पष्ट करताना याच आराखड्यात म्हटले होते, "बदल हा सामाजिक, सांस्कृतिक, आणि आर्थिक स्वरूपाचा तसेच गुणात्मक आणि संख्यात्मक असा दोन्ही प्रकारचा" असा यात अभिप्रेत आहे. थोडक्यात, लोकांच्या राहणीमानाचा दर्जा सुधारण्यावर या आराखड्यात भर देण्यात आला होता. 'इकोसॉक'च्या १९६६च्या अहवालात तर आर्थिक नि सामाजिक घटकांचे परस्परावलंबित्व गृहित धरून त्याला आर्थिक-सामाजिक नियोजनात स्थान द्यावे, असेही सुचविले होते. तरीही सामान्यतः १९६०च्या दशकात, आर्थिक वृद्धीची संकल्पनाच प्रभावी राहिली होती आणि युनोच्या सामाजिक विकास संशोधन संस्थेच्या १९७९च्या अहवालात कबूल केल्याप्रमाणे, या दशकात 'सामाजिक विकास' ही संकल्पना 'आर्थिक वृद्धी'ची एक पूर्वअट म्हणून आणि 'आर्थिक वृद्धी'साठी जो त्याग राष्ट्रांना करावा लागतो त्याच्या नैतिक समर्थनासाठी म्हणूनच वापरली गेली. अर्थात १९६०-७० या दशकाच्या अखेरीस 'आर्थिक वृद्धी'च्या संकल्पनेविषयीचा आशावादही झपाट्याने मावळत जात होता. या दशकाने अनेक समस्या निर्माण केल्या होत्या, आर्थिक वृद्धीच्या मर्यादा स्पष्ट होऊ लागल्या. त्याविषयींची धोरणे नि प्रक्रिया यांच्यातील उणीवा स्पष्ट होऊ लागल्या, आणि मुख्य म्हणजे, आर्थिक वृद्धीच्या वेगाबरोबर वाढत्या विषमतेचा ठळकपणे प्रत्यय येऊ लागला. सामाजिक धोरणे व नियोजन या संदर्भातील युनोच्या समितीच्या १९६९च्या अहवालात याची स्पष्ट कबुलीच दिली होती. त्यांनी दाखवून दिले होते की, तत्कालीन 'विकासा'ने दारिद्र्याने पिचलेल्या गतिरूद्ध अशा विभागांकडे केवळ दुर्लक्षच केले असे नाही, तर त्याने असे विभाग नव्याने निर्माणही केले.

**एकात्मिक विकास-** १९७०-८० या दुसऱ्या विकास दशकात भूमिका बदलण्यात आली. मागील दशकात आर्थिक व सामाजिक ही विकासाची दोन्ही अंगे वेगळी राखण्यात आली होती. आता त्यांचे एकत्रीकरण करण्याचा विचार पुढे आला. १९७० सालच्या २४ ऑक्टोबरला 'आंतरराष्ट्रीय विकासव्यूह' नक्की

करण्यात आला. त्यात असे आवाहन करण्यात आले की जागतिक स्तरावर आर्थिक व सामाजिक जीवनातील सर्वच अंगाचा विचार करणारी सर्वसमावेशक अशी व्यूहरचना विकासासाठी केली जावी. युनोने अशी 'एकात्मिक' भूमिका घेऊन विकास व नियोजनाच्या प्रकल्पाची आखणी केली. त्याची प्रमुख सूत्रे अशी होती. १. लोकसंख्येचा कोणताही भाग बदल नि विकास यांच्या प्रयत्नांच्या बाहेर न ठेवणे ; २. लोकसंख्येच्या सर्वच भागांना विकास प्रक्रियेत सहभागी होण्यास प्रवृत्त करता येईल व राष्ट्रांचा विकास साधेल अशा रीतीने रचनात्मक बदल घडवून आणणे ; ३. देशातील उत्पन्न व संपत्तीचे न्याय्य विभाजन होईल अशा दिशेने सामाजिक न्याय्यतेचे उद्दिष्ट ठरविणे ; ४.रोजगाराच्या संधी निर्माण करून नि देशातील बालकांच्या गरजांकडे अधिक लक्ष पुरवून मानवी क्षमतांच्या विकासाला प्राधान्य देणे.

**सहभागी विकास**

युनोच्या भूमिकेतून 'सहभागी विकासा'ची नवी संकल्पना उदयाला आली. परंतु १९७०च्या दशकातील विकासाची फलनिष्पत्ती धक्कादायक ठरली. विकासाची एकत्रित नि सर्वसमावेशक भूमिका घेऊन सुरू झालेल्या प्रयत्नांचा शेवट मात्र उलट दिशेने झाला.

पर्यावरण, लोकसंख्या, भूक, महिला, रोजगार असे राक्षसी प्रश्न एकापाठोपाठ एक समाजासमोर उभे ठाकले व प्रत्येक प्रश्नाचे स्वतंत्र अस्तित्व जाणवू लागले. कालांतराने या प्रत्येक प्रश्नाचे दुसऱ्या प्रश्नांशी असलेले लागेबांधे व गुंतागुंत विचारात घेऊन, कोणतातरी एखादा प्रश्न मध्यवर्ती ठेवून त्याच्या अनुषंगाने सर्वच प्रश्नांना हात घालावा, अशा तऱ्हेचे प्रयत्न सुरू झाले. आता 'विकासा'चे लक्ष वस्तुविकासाकडून व्यक्तीविकासाकडे वळू लागले.

**मानवकेंद्री विकास**

दाग हॅमरशिल्ड फौंडेशनने १९७५ साली विकासाची वेगळी संकल्पना पुढे मांडली. ही संकल्पना होती 'मानवकेंद्री विकासा'ची. युनोच्या जनरल असेंब्लीने १९७५च्या खास अधिवेशनात, विकासाची सामाजिक उद्दिष्टे गाठण्यासाठी वेगळ्या व्यूहरचनेची मागणी केली, आणि आंतरराष्ट्रीय श्रमसंस्थेने आपल्या जून १९७६च्या अधिवेशनात ही मागणी पूर्ण केली. 'मूलभूत गरजांचा दृष्टिकोण' देऊन आंतरराष्ट्रीय श्रमसंस्थेने, विसाव्या शतकाच्या अखेरीपर्यंत काही एक किमान राहणीमानाचा दर्जा, हे उद्दिष्ट देशांपुढे ठेवले. आता, दारिद्र्यनिर्मूलनाचा विचार पुढे येऊ लागला. देशादेशांतून त्या संदर्भातील उद्दिष्टे

नियोजनातून मांडली जावू लागली. इथे विचारांची दिशा बदलली गेली. विकासाचा परिणाम म्हणून लोकांच्या गरजांची पूर्तता आपोआप होईल असे आता न मानता मूलभूत गरजांचीच पूर्ती करण्यावर भर देण्यात येऊ लागला.

**स्थानिक विकास**

युनेस्कोच्या तज्ज्ञांनी, अगदी वेगळ्याच दिशेचा विचार, या सुमारास, पुढे आणला. त्यांनी 'स्थानिक विकासा'चा विचार मांडायला सुरवात केली. या संकल्पनेने औद्योगिक समाज सार्वत्रिकरित्या निर्माण करण्याची गरज आणि शक्यताही नाकारली. ते योग्य नाही असेही मानले; आणि प्रत्येक देशाने स्वतःची वैशिष्ट्ये विचारात घेण्याची आवश्यकता प्रतिपादन करावयास सुरूवात केली. या नव्या विचाराने मूळ विकासाच्याच संकल्पनेला हादरा दिला आहे. कारण, तोवर, आंतरराष्ट्रीय पातळीवरून सर्वच अल्पविकसित राष्ट्रांसाठी एकच एक विकासाची संकल्पना किंवा विकासव्यूह लागू करण्याचा अट्टाहास जो केला जात होता तो निरर्थक आहे ही जाणीव प्रकर्षाने झाली. आणि म्हणून १९८०-९० च्या दशकाला 'हरवलेले विकासदशक' म्हणून संबोधले गेले. अनेक देशांमधून दुरूस्तीच्या प्रक्रिया सुरू झाल्या आणि त्यात, तोवर विकास म्हणून जे जे काही घडविण्यात आले ते मोडण्याचा प्रयत्न सुरू झाला.

**पुनर्विकासाची प्रक्रिया**

उत्तरेत आणि दक्षिणेत त्याच्या वेगवेगळ्या प्रतिक्रिया उमटू लागल्या. १९९०च्या दशकात 'पुनर्विकासा'ची प्रक्रिया दोन्हीकडे सुरू झाली. पण उत्तरेत, जे यापूर्वी नीटपणे विकसित झाले नव्हते, अथवा जे कालविसंगत होते त्यांच्या विकासाचा नव्याने विचार केला जाऊ लागला. अमेरिका, रशिया, स्पेन, स्वित्झर्लंड, ऑस्ट्रिया, पोलंड, ब्रिटन अशा एक ना अनेक उत्तरेकडील देशांमध्ये, सार्वजनिक औषधे, अणूभट्ट्या, वाढते उत्पादन, जुन्या उत्पादनपद्धती, पर्यावरण दूषित करणारे कारखाने, विषारी कीटकनाशके यांचा नायनाट करणारी धोरणे आखण्यात येऊ लागली. त्यांचा नाश करणे किंवा त्यांची निर्यात करणे, त्यांना प्रयाय शोधणे असे धोरणविषयक उपाय अंमलात येऊ लागले.

दक्षिणेतही पुनर्विकासाची प्रक्रिया सुरू झाली. तेथेही काही प्रमाणात आधीच्या दशकातील 'विकासा'ची दुरूस्ती करण्यात येऊ लागली आणि जुन्या गोष्टींची जागा नवीन गोष्टी घेऊ लागल्या. परंतु त्या उत्तरेकडील 'नको' असलेल्या गोष्टींना स्थान देऊ लागल्या. उदाहरणार्थ, अणुकचरा, वातावरण

दूषित करणारे कारखाने किंवा तिकडे विकल्या न जाणाऱ्या अथवा बंदी घातली गेलेल्या वस्तू, अल्पविकसित देशांतून प्रवेश करू लागल्या. दुसरीही एक प्रक्रिया घडू लागली. गरिबी दूर करण्याच्या नावाखाली, असंघटित क्षेत्रातील लहान लहान उद्योग व व्यवसायांचे नूतनीकरण व आधुनिकीकरण होऊ लागले, हे एक प्रकारे या विभागाचे वसाहतीकरण ठरू लागले.

**सातत्यपूर्ण विकास**

या पुनर्विकासाच्या प्रक्रियेने १९९०-२०००च्या दशकात 'सातत्यपूर्ण विकासा'चे रूप घ्यायला सुरूवात केली आहे. मात्र सातत्यपूर्ण विकास हे शब्द फसवे आहेत, असे ह्या लेखकाचे म्हणणे आहे. नव्याने आलेली ही संकल्पना विकासाच्या परंपरागत संकल्पनेचे, व त्यातील आशयाचे सातत्य टिकवून ठेवण्यासाठी प्रसृत झाली आहे; तिला जगातील विविधतापूर्ण नैसर्गिक आणि मानवी समाज टिकवून ठेवण्याशी काहीही देणे-घेणे नाही; असे मत गुस्तावो इस्टेवा यांनी आपल्या विवेचनात मांडले आहे. याचे दृश्य स्वरूप दिसून येत आहे ते 'राष्ट्रसंघ विकास कार्यक्रम' (यू.एन.डी.पी.) १९९०पासुन प्रसिद्ध करीत असलेल्या 'ह्यूमन डेव्हलपमेंट रिपोर्टस्'मधून. या अहवालातून सर्व देशांची अनेक विकास निकषांच्या बाबतीत तुलना केलेली असते. आणि काही देश कसे या बाबींपासून फार दूर आहेत हे ठळकपणे दर्शविलेले असते. त्यासाठी त्यांनी 'मानवी विकास निर्देशक' तयार केलेला आहे; आणि तो १३० देशांना लावून दाखविला आहे. त्यात पुन्हा प्रामुख्याने भर दिला आहे जुन्या स्थूल राष्ट्रीय उत्पन्नांच्या निकषावर ! म्हणजे अजूनही, आग्रह धरला जातोय तो विकासाच्या आजच्या जागतिक अर्थव्यवस्थेतच ज्यांचे हितसंबंध गुंतले आहेत अशांना मान्य ठरणाऱ्या अशा जुन्याच निकषांवर.

**सामान्य माणूस व नवसमाजनिर्मिती**

गुस्तावो इस्टेवा यांनी या निबंधाच्या अखेरीस, अतिशय गांभिर्याने आजवर चालत आलेल्या आणि ज्यावर समाजाची जवळजवळ श्रध्दाच बसली आहे अशा अर्थशास्त्रावर व त्यातील 'आर्थिक मनुष्य', 'अमर्याद गरजा', 'मर्यादित साधने' हे द्वंद्व, व बाजार वा नियोजन या संकल्पनांवर आघात केला आहे. त्याच्या मते, आजच्या जागतिक जीवनात या संकल्पनांचे स्थान अगदी अपरिहार्य असे जे मानले जात आहे ते वास्तवाला धरून नाही. आजही अगदी सीमान्त स्तरावर जगणारे, बाजारपेठांपासून आपले जीवन सुरक्षित राखलेले आणि आपल्या मर्यादित गरजांशी उपलब्ध साधनांचा मेळ घालून जीवन समाधानाने व्यतीत

करणारे, शहाणे लोकसमूह अस्तित्वात आहेत. त्यांनी अर्थशास्त्राच्या संकल्पनांच्या मर्यादाच स्पष्ट केल्या जातात.

परंपरागत अर्थशास्त्राने नवीन आर्थिक मूल्ये आणून ती समाजात रुजविली आहेत. ती रुजविताना विरोध आणि हिंसा यांच्या साक्षीनेच ती लादली आहेत. परंतु त्यांनी समाजजीवनात कायम अस्तित्वात असणारी जीवनमूल्ये मात्र गमावली आहेत. या निबंधलेखकाने नव्या 'सामान्य माणसा'ची, कॉमनमॅनची संकल्पना 'आर्थिक मनुष्या'च्या जागी प्रस्थापित केली आहे. हा पुढील काळाशी सुसंगत ठरणारा 'सामान्य', आपल्यावर होणारे आर्थिक विश्वाचे आक्रमण थोपविण्यासाठी संघर्ष करणारा आहे. नवसमाजनिर्मितीचेच हे कार्य आहे. आर्थिक विश्वाच्या बेड्यातून सुटण्यासाठी, स्वतंत्र होण्यासाठी त्याने खेड्यांतून, वस्तींतून असे समान 'सामान्य लोक' निर्माण करायला सुरूवात केली आहे. हे नवे सामान्य लोक आपल्या पध्दतीने जीवन जगणार आहेत. बाजार किंवा नियोजन यांच्या आर्थिक तार्किकतेतून बाहेर राहणे हीच त्यांची जीवनधारणा असणार आहे. शिक्षण काय किंवा आरोग्य काय, अशा सर्व बाबतीत ते आपल्या संस्कृतीतील शहाणपणावर व या संदर्भात उपलब्ध होत जाणाऱ्या भरपूर ज्ञानावर आपले आयुष्य बेतणार आहेत. आपले अन्न , आपल्या जमिनी यांच्या संदर्भात ते परस्परांचे संबंध आणि आपण व पर्यावरण यांतील संबंध सतत समृध्द करीत जाणार आहेत. या दिशेने जीवन घडत गेले म्हणजे अर्थशास्त्राने प्रमाण मानलेली साधनांची मर्यादितता ही केवळ एक ऐतिहासिक घटना म्हणून लक्षात राहील. परंपरागत मनुष्याचे रूपांतर आर्थिक मनुष्यात करू पाहणाऱ्या विचार-आचारपद्धती अपयशी ठरल्यानंतर आता नव्याने उदयास येऊ पाहणाऱ्या या नव्या 'सामान्या'चे स्वागत करण्यासाठी आणि त्याचबरोबर ही नवी दिशा अस्तित्वात येण्यासाठी राजकीय कृतीचे आवाहनही लेखकाने केले आहे. अर्थात लोकांच्यातील विकासभ्रम दूर होऊन पुरेशी जाणीवजागृती निर्माण करण्यासाठी साऱ्या समाजालाच लेखकाने साकडे घातले आहे.

■■

संस्कृती

# व्यापारी संस्कृतीसाठी विविधतेचा बळी?

**मा**हिती तंत्रज्ञानाच्या या युगात जगाची वाटचाल 'एका खेड्या'कडे होत असल्याचे दिसते. 'जागतिक खेडे' ही रम्य कल्पना प्रत्यक्षात उतरविण्यासाठी वेगवेगळ्या पातळ्यांवर कधी सरकारकडून, कधी कंपन्यांकडून तर कधी समाजाकडून कळत नकळत प्रयत्न होत असल्याचे आढळते. जग जवळ येणे किंवा आणणे याचा अर्थ 'संपूर्ण जगात एकच संस्कृती असणे' असा घेतला जात आहे. खरे तर पश्चिमेकडील राष्ट्रे व्यापारात आघाडीवर असल्याने त्यांनी आपल्या सोयीसाठी हे सर्व, जागतिकीकरणाच्या माध्यमातून घडवून आणले आहे, असेही म्हटले जात आहे. 'जगात एकच संस्कृती हवी' याचा पुरस्कार करणारे असे म्हणतात की, जगातील विविधतेमुळेच अनेक संघर्ष झाले, अनेक युध्दे झाली.मूल्ये व श्रध्दा समान नसल्याने जगात सतत एक प्रकारची विषमता,एक प्रकारचा ताण असतो, तो दूर करण्यासाठी ही विविधता व मूल्यांमधील मतभेद हे संपविले पाहिजेत. हे स्पष्टीकरण पटले नाही तरी या विचारांचा एक गट आहे व तो त्या दिशेने प्रयत्न करीत आहे. या गटाचा यात स्वार्थही आहे कारण या गटात नफ्याच्या उद्दिष्टाने सहभागी झालेल्या बहुतांश बहुराष्ट्रीय कंपन्या आहेत. आपली उत्पादने जगाच्या कानाकोपऱ्यात पोचविण्यासाठी स्थानिक संस्कृतीत शिरकाव करून, त्यावर आक्रमण करून, तर कधी ती नष्ट करून या कंपन्या अधिकाधिक नफ्याचे उद्दिष्ट साध्य करीत आहेत.त्यामुळे जगातील सर्वच संस्कृती अशा प्रकारे हळूहळू नष्ट झाल्या, तर जगाचे कसेकसे नुकसान होईल यावर आता चर्चा सुरू आहे.

**स्थानिक संस्कृतीवर आघात**

इतिहासाकडे नजर टाकली तर असे लक्षात येते की, साम्राज्यवादी शक्तींनी आपले वर्चस्व प्रस्थापित करण्यासाठी स्थानिक संस्कृतींवर नेहमीच कोणत्या ना कोणत्या प्रकारे हल्ला केला आहे. हा हल्ला करण्यासाठी स्थानिकांच्या मनात, आहे त्या परिस्थितीबाबत असमाधान निर्माण करून, त्यात बदल व्हावा, अशी आकांक्षा त्यांच्यामध्ये उत्पन्न करणे हे आवश्यक ठरते. आणि हे करण्यासाठी त्यांच्यासमोर काहीतरी नवे वेगळे आशादायक चित्र जाणीवपूर्वक

उभे करावे लागते.विकसित राष्ट्रांमधील कंपन्या विकसनशील राष्ट्रांसमोर असे आशादायक चित्र उभे करण्याचा प्रयत्न करीत आहेत, असे म्हटले जात आहे. साधारणपणे या कंपन्या तीन-चार टप्प्यांमध्ये आपली योजना पूर्ण करू शकतात. अगदी सुरूवातीला आपल्या कार्यक्रमांमधे स्थानिक नेत्यांना सहभागी करून घेण्याचे ठरविण्यात येते. नंतर ज्या व्यक्तींना नव्या व जुन्या अशा दोन्ही संस्कृतींची जाण आहे व जो स्थानिक आणि परकीय (बहुतांश ठिकाणी इंग्रजी ) दोन्ही भाषा बोलू शकतो, अशा व्यक्तींच्या द्वारे कंपन्यांचे काम सुरू करण्यात येते. आताया मध्यस्थांच्या मार्फत स्थानिक संस्कृतींमधील समतोल ढासळविण्याचा प्रयत्न करण्यात येतो. प्रतिकूल परिस्थिती अनुकूल करून घेण्यासाठी जुन्या परंपरांना,श्रध्दांना,मूल्यांना धक्के बसतील अशा घटना सहजपणे घडत आहेत, असे चित्र समाजासमोर उभे करण्यात येते. त्यामुळे आपल्या समाजात बदल आवश्यक आहेत,असे सर्वांनाच वाटू लागते.एकदा ही आकांक्षा समाजमनात निर्माण झाली की मग काम सोपे होते.आणि स्थानिक समाजातील मूल्यांच्या गाभ्यात प्रवेश करून मुळावरच घाला घालण्यात येतो.

इतिहासात फार मागे न जाता एकोणिसाव्या शतकातील काही उदाहरणांवरूनही हे स्पष्ट होईल.या संदर्भात भारताचे उदाहरण बोलके आहे. याशिवाय इतर काही विकसनशील राष्ट्रांबाबतही असे घडले आहे. पण त्या इतिहासात जाण्याचे येथे प्रयोजन नाही. अर्थात या नव्या युगात आता या उद्देश्यपूर्तीसाठी दूरचित्रवाणी, संगणक, व इतर अत्याधुनिक साधनांच्या वापराबरोबर जाहिराती,पर्यटन-व्यवसाय, सांस्कृतिक देवाण-घेवाण यांचाही उपयोग करून घेण्यात येत आहे. व्यापाराधारित अर्थव्यवस्थेत अधिकाधिक आर्थिक नफा हेच ध्येय असल्यामुळे आपले उत्पादन बाजारात खपविण्यासाठी संपूर्ण जगात वेगवेगळया संस्कृतींवर आघात होत आहेत किंवा करण्यात येत आहेत. व्यापारात अमेरिका व युरोपमधील राष्ट्रे आघाडीवर असल्याने हा आघात होण्याला पश्चिमेकडील बहुराष्ट्रीय व इतर कंपन्या जबाबदार आहेत असे मानले जाते.

**जाहिरातींचा चतुराईने वापर**

पश्चिमेकडील राहणीमानाच्या, खाण्यापिण्याच्या, वागण्याबोलण्याच्या पध्दतीच सर्वोकृष्ट आहेत, तिकडची उत्पादनेच उत्तम असून त्यांचेच अनुकरण इतर राष्ट्रांमधील नागरिकांनी करावे, असे विविध मार्गांनी ग्राहकांच्या मनावर बिंबविण्यात येत आहे.

भारत, चीन, इंडोनेशिया, आफ्रिकेतील काही राष्ट्रे आणि इतर अनेक राष्ट्रांमधील परंपरागत संस्कृतीला पाश्चिमात्य संस्कृतीकडून हादरे बसत आहेत. जगात सर्वत्र एकच व्यापारी संस्कृती पसरविण्याच्या संकल्पनेत पश्चिमेकडील विविध ग्राहकोपयोगी वस्तू विकसनशील राष्ट्रांमधील ग्राहकांपर्यंत पोचविल्या जात आहेत. यात प्रामुख्याने शीतपेये, बर्गर, पावडरचे दूध, दुधाची भुकटी, फळे असे खाद्यपदार्थ तर आहेतच याशिवाय स्त्री-पुरूषांसाठी विविध सौंदर्यप्रसाधने, तयार कपडे, शालेय विद्यार्थ्यांसाठी खेळणी, पुस्तके अशा असंख्य वस्तुंचा समावेश आहे. पाश्चिमात्यांप्रमाणे निळे डोळे असावे, शरीर प्रमाणबद्ध असावे असे वाटणे व त्यासाठी शस्त्रक्रिया करवून घेणे असे लोण तर भारतातही आले आहे. गृहिणी व लहान मुलामुलींपर्यंत पोचण्याचे विशेष प्रयत्न पश्चिमेकडील कंपन्या करताना आढळतात, कारण त्यांना मुळात त्या वस्तूंची संकल्पना पोचवायची असते. उदाहरणार्थ, 'भारतातील एका खेड्यातील मुले क्रिकेट खेळताना तिथे सचिन तेंडुलकर यावा, असे त्यांचे स्वप्न खरे झाले असे दाखवून, सचिन तेंडुलकर त्यांच्या सोबत पेप्सी पितो' ही जाहिरात दूरचित्रवाणीवर काही महिन्यांपूर्वी सतत दाखविण्यात येत होती. आजच्या `मार्केटिंग'च्या क्षेत्रात `Concept Selling' हा शब्दप्रयोग प्रामुख्याने वापरला जातो आहे, तो याचसाठी. घरगुती स्वच्छतेसाठी वापरण्याच्या विविध वस्तू आणि सौंदर्यप्रसाधने व खाद्यपदार्थ यांच्यासंदर्भात अनेक जाहिराती करण्यात येत आहेत. अमेरिकेतील 'ॲव्हॉन' कंपनीची सौंदर्यप्रसाधने आफ्रिकेतील अमेझॉनच्या खोऱ्यात विक्रीसाठी पाठविण्यात येत आहेत,तर 'ॲमवे'ची उत्पादने भारतात बाजार मिळवीत आहेत. "स्थानिक हे वाईट, निरूपयोगी, परकीय ते उत्तम" हे नागरिकांच्या मनावर बिंबविण्याचे प्रयत्न करण्यात येत आहेत, असे अमेरिकेच्या चीनमधील जाहिरात कंपनीत काम करणाऱ्या अमेरिकन अधिकाऱ्याने सांगितले. याहीपेक्षा महत्त्वाचे म्हणजे 'आपल्या संस्कृतीत जे जे आहे, ते वाईट असून त्याची आपल्याला लाज वाटली पाहिजे', असेही ठसविण्याचा प्रयत्न होत आहे.

**पर्यटनाचे माध्यमही महत्त्वाचे**

भारतातील लडाख या भागातील नागरिकांवर पर्यटनाच्या माध्यमातून असेच सांस्कृतिक आक्रमण करण्यात आले आहे. लडाखमधील जीवन कष्टाचे आहे हे नक्की, पण तेथील नागरिक काही वर्षांपूर्वी स्वयंपूर्ण होते. त्यांच्या राहणीमानाच्या कल्पनेप्रमाणे त्यांची आर्थिक स्थिती चांगली होती. प्रत्येकाला काही ना काही काम होते आणि उपासमारी, बेरोजगारी हे प्रश्न त्यांना माहिती नव्हते.

लडाखीं नागरिकांजवळ रोख पैसा फारसा नव्हता तरी त्याची त्यांना तमा नव्हती. पण पर्यटनाच्या माध्यमातून देशविदेशातील पर्यटक लडाखचे निसर्ग-सौंदर्य पाहण्यासाठी येऊ लागले आणि त्यामुळे परकीय संस्कृती तिथे पाय रोवू लागली. पर्यटकांसाठी सोयी सुविधा उपलब्ध करून देताना लडाखची परंपरागत संस्कृती (खाद्यपदार्थ, कपडे इ.) मागे पडू लागली. आता लडाखमधील स्थानिक कच्चा माल न वापरता परराज्यातून व परदेशातून आणलेला कच्चा माल वापरून तेथे इमारती व इतर वस्तू बनविण्यात येऊ लागल्या. दूरचित्रवाणीच्या माध्यमातून तेथे `सर्वकाही' पोचले. त्यामुळे अर्थव्यवस्था, नागरिकांची स्वयंपूर्ण राहणी यावर एकदम वाईट परिणाम झाला. सुमारे वीस वर्षांपूर्वी सुखी व समाधानी आयुष्य जगणारे लडाखी नागरिक आता परकीयांसमोर `आम्ही गरीब आहोत, आम्हाला मदत करा', अशी याचना करताना दिसतात.

असेच भूतानमध्येही घडले आहे. वेगवेगळ्या वंशाचे लोक येथे कित्येक वर्षांपासून राहात आहेत. स्थानिक कच्च्यामालाच्या उपलब्धतेनुसार तेथे प्रत्येकाला गरजेप्रमाणे काम मिळत होते, त्यांना उदरनिर्वाहाचा प्रश्न नव्हता. पण गेल्या दोन दशकांत आर्थिक विकासाच्या प्रयत्नात तेथे बेरोजगारी वाढली आणि विविध वंशांमध्ये संघर्ष निर्माण झाला. युगोस्लाव्हिया, रवांडा, कोसावो येथील संघर्षाच्या मुळाशी असलेली पार्श्वभूमी शोधण्याचा प्रयत्न केला तर असे आढळते की राजकारण, अर्थकारण यांबरोबरच संस्कृतीवर करण्यात येणारे आक्रमण व त्यातून स्थानिकांची सामाजिक अस्तित्व कायम राखण्याची मानसिकता हीच महत्त्वाची कारणे यामागे असतात.*

आपली अस्मिता, आपले वेगळेपण हे त्या समाजाचे `स्वत्व' असते. म्हणूनच प्रत्येक समाजाच्या चालीरीती, परंपरा, मूल्ये, श्रध्दा यांना महत्त्व असते. खरे तर बरेचदा, स्थानिक वस्तूंच्या उपलब्धतेनुसार, हवामानाचा व पर्यावरणाचा विचार करूनच बहुतांश समाजात त्या पध्दती रूढ झालेल्या असतात. आजच्या 'शहरी आर्थिक विकासाच्या' दृष्टिकोणातून त्यांचा विकास झालेला नाही असे वरकरणी वाटू शकते. पण प्रत्यक्षात ती जीवनपध्दती तेथे योग्य असते. समजा त्या जीवनपध्दतीत चांगले बदल घडवायचेच असतील तर त्या समाजाला परावलंबी बनवून, निसर्गाचा समतोल बिघडवून त्यात सुधारणा कशी होईल ? पण व्यापार वाढविण्यासाठी अशा मूलभूत प्रश्नांचा विचार करण्यात येत नाही.

---

* एन. हिलयार्ड - 'ब्लड अँड कल्चर', एम.चोसुदोवस्की -'डिसमँटलिंग युगोस्लविया'

कारण 'व्यापार वाढण्यासाठी जगात एकच संस्कृती हवी' हाच एककलमी कार्यक्रम राबविण्याचे ठरविण्यात आलेले असते.

**स्वार्थासाठी कंपन्यांच्या धोरणात बदल**

या सर्व विषयाशी संबंधित दुसरी बाजू आहे ती म्हणजे बहुराष्ट्रीय कंपन्या व इतर पाश्चिमात्य कंपन्याच्या धोरणामध्ये काही वेगळे बदल होण्याची. म्हणजेच, व्यापारी संस्कृतीमुळे जसे स्थानिकतेत बदल होत आहेत व होणार आहेत तसेच काहीसे बदल अशा व्यापारी कंपन्यामध्येही व्हावे लागणार आहेत, असा एक विचार मांडण्यात आला आहे. चीन, भारत, इंडोनेशिया व ब्राझील आणि इतर काही राष्ट्रांमधील संख्येने सतत वाढणारा मध्यमवर्गीय ग्राहक डोळ्यापुढे ठेवून, त्या गटाला स्थानिक परिस्थितीनुरूप काय हवे तेही देण्याची योजना या कंपन्यांना आखावी लागणार आहे. उदाहरणार्थ 'मॅकडोनाल्ड' या खाद्यपदार्थांच्या मोठ्या कंपनीने 'बर्गर' हा पदार्थ या ग्राहकांपर्यंत पोचविला पण स्थानिकांची आवड व कल ओळखून त्यांना शाकाहारी (भाज्यायुक्त) बर्गर तयार करणे भाग पडले. सर्वसामान्य ग्राहकवर्ग डोळ्यापुढे ठेवून उत्पादनांचा दर्जा, वैविध्य, रंग, चव, माफक किंमत, ग्राहकांपर्यंत पोचविण्याच्या वेगवेगळ्या पध्दती अशा सर्व बाबींचा विचार या कंपन्यांना आता करावा लागत आहे. थोडक्यात, व्यापारासाठी का होईना त्यांना स्थानिक संस्कृती, पध्दती समजून घ्यावी लागत आहे आणि याचसाठी त्यांना त्या त्या देशातील नागरिकांना उच्चपदावरील नोकरीतही सामावून घ्यावे लागत आहे.

'जग एक खेडे असावे', 'जगात एकच संस्कृती असावी' यासाठी केवळ व्यापारी मार्गाने प्रयत्न करण्यात आले तर त्याचे परिणाम वाईट होण्याचीच शक्यता जास्त आहे, अशी भीती आजच्या सामाजिक परिस्थितीवरून व्यक्त करण्यात येते. कारण या प्रक्रियेत निसर्गाच्या विरोधात जाऊन, कृत्रिम जीवनपद्धती लादण्याचा प्रयत्न दिसतो. आजच्या आधुनिक युगातील माणूस व्यक्तिकेंद्री होत आहे. समाजाशी असलेली त्याची नाळ तुटते आहे. जग जवळ येत असले तरी माणूस माणसापासून दूर जात आहे, असे दिसते. जगात सगळीकडे एकाच प्रकारच्या संस्कृतीमुळे एकसुरी आयुष्य निर्माण झाले तर माणूस यंत्रवत जीवन जगेल. त्यातून अनेक गुंतागुंतीचे प्रश्न निर्माण होण्याची शक्यता आहे. त्यामुळेच 'जगात एकच (व्यापारी) संस्कृती' असणे समाजस्वास्थ्यासाठी धोक्याचे आहे असे म्हटले जात आहे.

■■

(संदर्भ : 'द इकॉलॉजिस्ट' - जुलै / ऑगस्ट १९९९, 'द हार्वर्ड बिझिनेस रिव्ह्यू' - जुलै - ऑगस्ट १९९८.)

व्यापार

# व्यापाराधारित अर्थव्यवस्था धोक्याची?

एखादे शतक संपून नवीन शतक सुरू होणे ही तशी खूप नाविन्याची घटना असण्याचे कारण नाही. पण प्रत्येक शतकाचे स्वतःचे असे एक वेगळेपण इतिहासाने जपलेले असते आणि आता तर शतकाबरोबरच नवीन सहस्रकही सुरू होत आहे, कदाचित म्हणूनच नव्या शतकाच्या प्रारंभाबद्दल समाजमनात उत्सुकता आहे. पण या उत्सुकतेबरोबरच मानवाच्या सर्व प्रकारच्या प्रगतीच्या अतिरेकाने काही शंकाही उपस्थित करण्यात येत आहेत. मुख्य म्हणजे विसाव्या शतकात जगातील सर्व राष्ट्रांची आर्थिक, सामाजिक प्रगती समानतेने झालेली नाही. समतेचे उद्दिष्ट केवळ कागदोपत्रीच राहिले आहे. त्यातच जागतिकीकरणाच्या प्रक्रियेत विषमताच वाढतांना आढळत आहे. विसाव्या शतकाअखेरीचा काळ हा जागतिकीकरणाच्या उदयाचा आहे, असे म्हणता येईल. त्यामुळे एकविसाव्या शतकाच्या पूर्वार्धाचा केंद्रबिंदू 'जागतिकीकरण' हा असण्याची शक्यताच जास्त आहे.

जागतिकीकरण होत असताना बहुतेक सर्वच देशांमधील अर्थव्यवस्था एका स्थित्यंतराच्या कालखंडातून जातात. हा एक प्रकारचा अस्थिरतेचा काळ असतो. या परिस्थितीचा प्रगत राष्ट्रांच्या अर्थव्यवस्थेवर खूप गंभीर परिणाम होतोच असे नाही. मात्र विकसनशील राष्ट्रांची अर्थव्यवस्था अडचणीत येऊ शकते. यामुळे जागतिकीकरणाच्या व अर्थव्यवस्थांच्या उदारीकरणाच्या प्रक्रियेत विकसनशील राष्ट्रांनी नेमकी कोणती धोरणे अवलंबावीत, यांबाबत साशंकता राहते. अर्थव्यवस्थेच्या उदारीकरणाच्या समर्थनार्थ व विरोधार्थ विविध मुद्दे मांडण्यात येतात. भारतातही सध्या अगदी असेच वातावरण आहे. पण कोणत्याही चर्चेत न अडकता, जागतिकीकरणामुळे स्वीकारलेल्या नव्या आर्थिक धोरणाचे भारतीय अर्थव्यवस्थेवर नेमके काय परिणाम झाले आहेत किंवा होण्याची शक्यता आहे याचा सर्वंकष विचार होणे गरजेचे आहे.

जागतिकीकरणाच्या लाटेत व्यापाराला अतिशय महत्त्व प्राप्त झाले आहे. व्यापार हा अर्थव्यवस्थेचा कणा म्हणता येईल. तेव्हा व्यापार व (सध्या केवळ) त्यावरच अवलंबून असलेली अर्थव्यवस्था, हा संबंध समजून घेत त्याचा

अभ्यास केला जाणे हेही क्रमप्राप्तच आहे. या संदर्भात, दिल्ली येथील जवाहरलाल नेहरू विद्यापीठातील अर्थशास्त्र व नियोजन अभ्यासकेंद्रातील प्राध्यापिका श्रीमती सुनंदा सेन यांनी, 'ट्रेड अँड डिपेंडन्स' या नावाने एक अभ्यासपूर्ण पुस्तक लिहिले आहे. बदललेल्या जागतिक परिमाणांच्या आराखड्यात भारतीय अर्थव्यवस्थेचा विचार करताना या पुस्तकात परराष्ट्रीय व्यापार, आयात-निर्यात धोरण, परकीय चलनाची गंगाजळी, देशांतर्गत आर्थिक धोरणांवर निर्बंध आणणारी बाह्य परिस्थिती, अशा अनेक बाबींचा सखोल विचार करण्यात आला आहे. भारताने १९९०च्या दशकात स्वीकारलेल्या खुल्या आर्थिक धोरणांमुळे झालेले व होऊ शकणारे परिणाम लेखिकेने मांडले आहेत. याबाबत लेखिकेने काही निरीक्षणांचा उल्लेख प्रस्तावनेत केला आहे. 'व्यापार व त्यावर आधारित अर्थव्यवस्था' या विषयाची व पुस्तकाची ओळख व्हावी आणि या विषयाचे आपल्यावर प्रत्यक्ष व अप्रत्यक्षरित्या होणारे परिणाम समजून घेता यावेत, यासाठी त्या प्रस्तावनेतील काही मोजक्याच मुद्यांच्या आधारे हा लेख लिहिण्यात आला आहे.

**भारताची आंतरराष्ट्रीय व्यापाराची पार्श्वभूमी**

खुल्या आर्थिक धोरणांचा स्वीकार करणे म्हणजे सोप्या भाषेत आंतरराष्ट्रीय व्यापाराचे महत्त्व वाढविणे, व्यापारात 'राष्ट्रा'चा किंवा 'सरकार'चा हस्तक्षेप कमी करणे. या व्यापारातून अर्थव्यवस्था बळकट करणे म्हणजे जास्तीत जास्त परकीय चलन मिळविणे. ओघानेच परकीय चलन मिळविण्यासाठी निर्यात वाढविणे. आयातीच्या तुलनेत निर्यात खूप वाढली, तरच निर्यातीतून आर्थिक लाभ होऊन अर्थव्यवस्थेला फायदा होऊ शकतो. 'निर्यातीतून विकास' असे हे सूत्र आहे. स्वातंत्र्योत्तर भारताच्या तत्कालीन नेतृत्वाने (पं.नेहरू यांची कारकीर्द १९४७ते १९६४) 'विकासासाठी औद्योगिकीकरण' हे पाश्चिमात्त्यांचे धोरण स्वीकारले. परकीय तंत्र-मंत्र व भांडवलाशिवाय आपणास विकासाच्या मार्गावर पावले टाकता येणार नाहीत, ही नेहरूंच्या विकास प्रतिमानाची गृहित भूमिका असल्यामुळे, 'भारताची आयात' सतत वाढती राहिली. परिणामी या आयातीसाठी परकीय चलनाची गरजही काळाबरोबर वाढतच गेली. भारताने औद्योगिक विकासाची कास धरण्यासाठी दुसऱ्या पंचवार्षिक योजनेच्या सुरूवातीस, परकीय चलनाची गंगाजळी आटल्यावर, परदेशांकडे आर्थिक मदत मागितली. तेव्हापासून भारतावरील परकीय कर्ज वाढतच राहिले. १९९० च्या सुरूवातीस भारतात परकीय चलनाच्या साठ्यात मोठी घट झाली.

तेव्हा या आर्थिक संकटातून बाहेर पडण्यासाठी भारताला 'व्यापाराधारित अर्थव्यवस्थे'ची कास धरावी लागली. यामागे अर्थात भारताला मदत करणाऱ्या आंतरराष्ट्रीय आर्थिक संस्थांचा दबाव असणार हे उघडच आहे. निर्यात वाढवून मिळणारा पैसा हा विकासकार्यासाठी वळविला तर त्यातून अर्थव्यवस्था सावरणे शक्य असते. पण भारताची निर्यात ही बहुतांशी कर्जफेड करण्यासाठीच वापरली गेली. निर्यात ही जोवर देशातील अतिरिक्त वस्तूंची / सेवांची केली जाते तेव्हा ती योग्य असते. नागरिकांना त्याच वस्तू व सेवा पुरेशा प्रमाणात उपभोगासाठी मिळाल्यानंतर उरलेल्या वस्तुंची निर्यात केली जाते, तोवर ती समस्या नसते; उलट ती देशाला फायदेशीर ठरू शकते. परंतु जेव्हा गरजेच्या आणि आपल्याला हव्या असलेल्याच वस्तू आपण निर्यात करू लागतो तेव्हा अशी निर्यात अंतिमतः नुकसानीची ठरते. त्यातही, आपण निर्यातदारांचे खिसे नि परकियांचे वासे भरू लागतो, तेव्हा निर्यात हीच एक मोठी समस्या म्हणून, आपल्यापुढे उभी राहते.

हा मुद्दा स्पष्ट करताना लेखिकेने म्हटले आहे की, आंतरराष्ट्रीय व्यापार वाढल्याने भारतासारख्या कर्जबाजारी देशाला फायदा होईलच असे ठामपणे प्रतिपादन करता येत नाही, कारण या व्यापाराद्वारे देशांतर्गत मूलभूत सोयीसुविधा व संसाधने यांच्या दर्जात सुधारणा व वाढ होतेच असे नाही. परकीय गुंतवणूकीचा फायदाही भारताला आजवर करून घेता आलेला नाही, कारण, या गुंतवणूकीचा उपयोग पुन्हा परकीय कर्ज परत करण्यासाठी व परकीय चलनाच्या गंगाजळीत घट येऊ नये यासाठी करण्यात आला. देशांतर्गत संसाधनांच्या वाढीसाठी परकीय गुंतवणुक वापरता न आल्याने देशाची आर्थिक प्रगती अपेक्षेएवढी होऊ शकली नाही.

दुसरीकडे 'व्यापाराधारित अर्थव्यवस्था' स्वीकारावी लागल्याने व आंतरराष्ट्रीय संस्थांकडून आर्थिक मदत घेतल्याने आयातीचे दरवाजे उघडावे लागले आहेत, आणि निर्यात मात्र मोठ्या प्रमाणावर वाढलेली नाही. त्यामुळे निर्यातवाढीतूनही भारताला मूलभूत संसाधनांमध्ये वाढ करण्यासाठी निधी उपलब्ध झालेला नाही. उलट, आपला कर्जाचा परतावा वाढता राहिल्याने आपल्याला परकीयांकडून आधिकाधिक आर्थिक सहाय्य मिळवावे लागले व या आर्थिक सहाय्यातील मोठा वाटा पुन्हा विकासाऐवजी कर्जफेडीसाठीच वापरण्यात आला. आयात जास्त व निर्यात तुलनेने कमीच राहिल्याने आंतरराष्ट्रीय व्यापाराचा भारताला अपेक्षेइतका फायदा झालेला नाही.

भारताच्या आयात व निर्यातीच्या पुढील आकडेवारीवरून हा मुद्दा आणखी स्पष्ट होईल.

(सर्व आकडे कोटी रूपयात)

| वर्ष | निर्यात | आयात |
|---|---|---|
| १९८८-८९ | २०,२३२ | २८,२३५ |
| १९८९-९० | २७,६५८ | ३५,३२८ |
| १९९०-९१ | ३२,५५३ | ४३,१९८ |
| १९९१-९२ | ४४,०४१ | ४७,८५१ |
| १९९२-९३ | ५३,६८८ | ६३,३७५ |
| १९९३-९४ | ६९,७५१ | ७३,१०१ |
| १९९४-९५ | ८२,६७४ | ८९,९७१ |
| १९९५-९६ | १,०६,३५३ | १,२२,६७८ |
| १९९६-९७ | १,१८,८१७ | १,३८,९२० |
| १९९७-९८ | १,३०,१०१ | १,५४,१७६ |

( संदर्भ - इंडियन इकॉनॉमिक सर्व्हे १९९९-२०००.)

**रोगापेक्षा औषध जालीम**

लेखिकेने दुसरा मुद्दा असा मांडला आहे की या दुष्टचक्रातून बाहेर पडण्यासाठी तीन मार्ग सुचविले जातात. एक म्हणजे रुपयाचे अवमूल्यन करणे, दुसरे म्हणजे व्यापार व गुंतवणुकीवरील निर्बंध दूर करणे आणि तिसरे म्हणजे अंदाजपत्रकाच्या वेळी काही कठोर पावले उचलणे (अनुदानात कपात इ.) या अशा सुधारणा करताना, बाह्य किंवा परकीय आर्थिक वातावरणाचे देशांतर्गत आर्थिक वातावरणावर जे बरे-वाईट परिणाम होत असतात, त्यांचा विचार मात्र पुरेसा होत नाही. परकीय संस्कृतीचे, वस्तूंचे आर्थिक आक्रमण दुर्लक्षिले जाते. (याच अंकातील 'व्यापारी संस्कृतीसाठी विविधतेचा बळी' हा लेख पाहावा.)

विकसनशील राष्ट्रांमधील अर्थव्यवस्थांवर विशेषतः या राष्ट्रांच्या आंतरराष्ट्रीय व्यापारासंदर्भातील अर्थव्यवस्थेवर देशांतर्गत व देशाबाहेरील कारणांचा, घटकांचा फार मोठा परिणाम होत असतो. याचे स्पष्टीकरण लेखिकेने असे दिले आहे की, आर्थिक मदत करणाऱ्या आंतरराष्ट्रीय संस्थाच वरील उपाय विकसनशील राष्ट्रांना सुचवीत असतात. या उपायांचा अवलंब करूनही निर्यात वाढविण्याचा प्रयत्न भारतासारख्या विकसनशील राष्ट्रांनी केला तरी त्याचा

फारसा उपयोग होत नाही, कारण कर्जबाजारी राष्ट्रांच्या मताला व वस्तूंना आंतरराष्ट्रीय बाजारात 'किंमत' नसते. मदत करणारी राष्ट्रे जागतिक मंदीच्या नावाखाली व आपल्या देशातील उद्योगांचे हित जपण्यासाठी विकसनशील राष्ट्रांमधील वस्तूंची आयात आपल्या देशात होऊ देत नाहीत. अमेरिकेसारख्या काही प्रगत देशांमध्ये परकीय वस्तूंवर जास्त आयातकर लावण्यात येतो. त्यामुळे त्या वस्तू महाग होतात. शिवाय जागतिक व्यापारात त्या त्या भागातील प्रादेशिकवादही डोकावत असतोच. त्यामुळे एका बाजूने, निर्यातीवर बंधने येत जातात, दुसऱ्या बाजूने, पायाभूत सोयीसुविधा पुरेशा प्रमाणात उपलब्ध न झाल्याने वस्तूंचा / सेवांचा दर्जा (आंतरराष्ट्रीय बाजारात) राखणे अवघड होत जाते. तिसऱ्या बाजूने, परकीय मदत घेतल्याने आयातीवरील निबंध शिथिल करावे लागतात, म्हणजे, आयात वाढतच राहते व निर्यात मात्र वाढत नाही. त्यामुळे खुल्या आर्थिक धोरणांचा व व्यापाराधारित अर्थव्यवस्थेचा फायदा भारतासारख्या कर्जाच्या विळख्यात अडकलेल्या विकसनशील राष्ट्रांना होत नाही. रोगापेक्षा औषध जालीम असा हा प्रकार आहे.

**एकूण राष्ट्रीय उत्पन्नावरही परिणाम**

तिसऱ्या मुद्यात, लेखिकेने, आंतरराष्ट्रीय व्यापाराचा विशेषत आयातीचा एकूण राष्ट्रीय उत्पन्नावर होणारा परिणाम सांगितला आहे. त्यांचे असे म्हणणे आहे की, आयात वाढत असताना विकसनशील राष्ट्रांच्या एकूण राष्ट्रीय उत्पन्नातीलही आयातीचा वाटा वाढत असतो. (खालील तक्ता पाहावा.)

**एकूण राष्ट्रीय उत्पन्नातील आयात व निर्यातीचे प्रमाण**

| वर्ष | निर्यात | आयात |
|---|---|---|
| १९९१-९२ | ६.७ | ७.७ |
| १९९२-९३ | ७.१ | ९.४ |
| १९९३-९४ | ८.१ | ९.६ |
| १९९४-९५ | ८.१ | १०.९ |
| १९९५-९६ | ८.९ | १२.० |
| १९९६-९७ | ८.६ | १२.३ |
| १९९७-९८ | ८.३ | १२.२ |

( संदर्भ - इंडियन इकॉनॉमिक सर्व्हे १९९८-९९.)

म्हणजे एकूण राष्ट्रीय उत्पन्न हे देखील आंतरराष्ट्रीय व्यापाराशी जोडले जाते.

देशांतर्गत सोयीसुविधा व विकास होऊन, वस्तू व सेवांची विक्री वाढून एकूण राष्ट्रीय उत्पन्न वाढले, तर देशाची अर्थव्यवस्था मजबुतीकडे वाटचाल करीत आहे, असे म्हणणे योग्य असते पण भारतात तसे झालेले नाही. आयातीचा एकूण राष्ट्रीय उत्पन्नातील वाटा वाढणे हे धोकादायक व अर्थव्यवस्थेला अस्थिरतेकडे नेणारे आहे. थोडक्यात आयात वाढवून आपणच अर्थव्यवस्थेला अडचणीत आणतो, असे सध्याचे चित्र आहे.

व्यापाराधारित अर्थव्यवस्थेकडे वाटचाल करताना ही गोष्ट लक्षात घेतली पाहिजे, ती म्हणजे आंतरराष्ट्रीय व्यापाराचे, आंतरराष्ट्रीय भांडवलबाजाराचे काही अंगभूत नियम, काही पध्दती असतात, असे लेखिकेने चौथ्या मुद्यात स्पष्ट केले आहे. विकसनशील राष्ट्रांनी आपली अर्थव्यवस्था मजबूत होण्याआधीच जर त्या व्यापारात प्रवेश केला, तर त्यातून होणारे तोटे हे अटळ व दूरगामी परिणाम करणारे असू शकतात. जास्तीत जास्त भांडवल आयात करणाऱ्या देशांना अर्थव्यवस्थेतील अस्थिरतेला सामोरे जावेच लागते.

**भारतीय उद्योगांमधील अस्थिरता**

या सर्वाचा परिणाम होऊन सध्या भारतीय उद्योगांमध्ये एक प्रकारचे अस्थिरतेचे वातावरण निर्माण झाले आहे. जागतिक स्पर्धेला सामोरे जाण्यासाठी भारतीय वस्तू व सेवांचा दर्जा उत्कृष्ट असायला हवा. अनेक बाबतीत तो तसा नाही ही वस्तुस्थिती आहे. अर्थात त्याची कारणेही अनेक आहेत. दुसरे म्हणजे, ज्या अशा दर्जेदार वस्तू व सेवा आहेत त्यांना जागतिक बाजारात संधी मिळतेच असे नाही. वाढत्या स्पर्धेला सामोरे जाण्यासाठी भारतातील खाजगी तसेच सार्वजनिक क्षेत्रातील उद्योग कठोर पावले उचलत आहेत. त्यात नवनवीन यंत्रसामग्री आणणे, परकीय भांडवल आणणे, श्रमावरील खर्च कमी करणे अशा प्रकारच्या उपायांचा समावेश आहे व त्यामुळे कर्मचाऱ्यांची कपात मोठ्या प्रमाणावर करण्यात येत आहे, या सर्व बाबी अशा कुठे ना कुठे व्यापाराधारित अर्थव्यवस्थेशी संबंधित असतात. त्यामुळे जागतिकीकरणाच्या प्रक्रियेतून आपल्या देशाच्या अर्थव्यवस्थेवर येणारे संकट टाळण्यासाठी देशांतर्गत अर्थव्यवस्था, उद्योग-व्यापार हे बळकट करण्याची आवश्यकता आहे, असे मत लेखिकेने बऱ्याच अभ्यासांती व्यक्त केले आहे.

■■

संदर्भ - १) ट्रेड अँड डिपेंडन्स - प्रा. सुनंदा सेन २) नववसाहतवाद आणि आधुनिक भारत - प्रा. गोपाळ राणे ३) विकास -विचार - प्रा. रमेश पानसे.

# पूर्व आशियातील आर्थिक प्रादेशिकवाद

गेल्या काही वर्षांपासून आंतरराष्ट्रीय संबंधांमध्ये बरेच बदल होत गेलेले आढळतात. शीतयुध्दाच्या समाप्तीनंतरच्या काळात साम्यवादी राष्ट्रांची लोकशाहीकडे होणारी वाटचाल, तसेच जगावर मुक्त व्यापाराचा पडणारा प्रभाव आणि माहिती तंत्रज्ञानाची सर्वदूर पोचण्याची क्षमता, या घटकांनी आंतरराष्ट्रीय संबंधांमध्ये महत्त्वपूर्ण भूमिका बजावली, असे म्हणता येईल. जगातील कोणत्याही कोपऱ्यात अतिशय कमी वेळात संपर्क साधणे शक्य झाल्याने, एकीकडे जग जवळ येण्याची प्रक्रिया वेगाने चालू आहे असे दिसते; तर दुसरीकडे जागतिकीकरणातही आपली अस्मिता व 'आपले जग' वेगळे ठेवण्याचा प्रयत्न होत असल्याचे आढळते. आंतरराष्ट्रीय संबंधांमध्ये व्यापार हा सर्वात महत्त्वाचा घटक असून माहिती तंत्रज्ञानाच्या या युगाचा फार मोठा फायदा व्यापाराला झाला आहे.

पश्चिमेकडील राष्ट्रांनी आंतरराष्ट्रीय संबंधांमध्ये व्यापाराचा व नव्या तंत्रज्ञानाचा उपयोग मोठ्या प्रमाणावर केला आहे. अमेरिका व युरोपमधील राष्ट्रे बहुतेक वेळा व्यापारात अग्रस्थानी राहिली आहेत. जागतिक अर्थव्यवस्थेवर दबाव आणू शकण्याइतकी ती सक्षम झाली आहेत. युरोपमधील राष्ट्रांनी 'युरोपीय आर्थिक समुदाय' व 'युरो' (युरोपमधील ११ राष्ट्रांचे सामायिक चलन) हे नवे चलन निर्माण करून, युरोपीय राष्ट्रांचे 'आर्थिक एकत्रीकरण' पण 'अमेरिकेपासून वेगळेपण' अशी दोन्ही उद्दिष्टे साधण्याचा प्रयत्न केला आहे.

या तुलनेत पूर्वेकडील राष्ट्रे मात्र व्यापारात एकत्रितरित्या तेवढी बळकट झालेली नाहीत. किंबहुना जागतिक अर्थव्यवस्थेवर जसा पश्चिमेकडील राष्ट्रांचा प्रभाव आहे, तसा तो पूर्वेकडील राष्ट्रांचा नाही, ही वस्तुस्थिती आहे, हे लक्षात घेऊन पश्चिमेकडील राष्ट्रांप्रमाणे आपणही आपला 'गट' प्रभावी करावा, या दृष्टीने पूर्वेकडील राष्ट्रांनी व्यापारासाठी एकत्र येण्यासाठीच्या हालचाली सुरू केल्या आहेत. या संदर्भात 'द इकॉनॉमिस्ट' या नियतकालिकाने 'एशिया पॅसिफिक इकॉनॉमिक को-ऑपरेशन फोरम'च्या (ॲपेक - APEC) सन्माननीय तज्ज्ञ व्यक्तींच्या गटाचे अध्यक्षपद भूषविलेल्या व 'इन्स्टिट्यूट फॉर इंटरनॅशनल

इकॉनॉमिक्स' (वॉशिंग्टन) येथील संचालकपदाची जबाबदारी सांभाळणाऱ्या फ्रेड बर्गस्टन यांचा एक विशेष लेख प्रसिध्द केला आहे. १९९३ ते १९९५ या काळात एकविसाव्या शतकाच्या पूर्वार्धासाठी 'ॲपेक व मुक्त व्यापार' या संबंधीचे धोरण आखले गेले, तेव्हाच बर्गस्टन 'ॲपेक'च्या वर उल्लेखित गटाचे अध्यक्ष होते. 'पूर्व आशियातील प्रादेशिकवाद' या शीर्षकाखाली त्यांनी लिहिलेल्या लेखातील महत्त्वाचे मुद्दे येथे संकलित केले आहेत.

**आशियातील प्रयत्न**

मलेशियाचे तत्कालिन पंतप्रधान महाथिर मोहम्मद यांनी सर्वात प्रथम पूर्व 'आशियाई आर्थिक गट' (ईस्ट एशियन इकॉनॉमिक ग्रुप - EAEG) स्थापन करावा असे सुमारे दशकापूर्वी सुचविले होते. पण तेव्हा याबाबत फारशी प्रगती झाली नाही, याची प्रमुख कारणे म्हणजे महाथिर मोहम्मद हे संरक्षणवादी समजले जात होते व अमेरिकेला 'ॲपेक'चे जास्त महत्त्व वाटत होते. त्यानंतर मात्र 'एसिआन + 3' म्हणजे (आशियातील कंबोडिया, ब्रुनेई, इंडोनेशिया, लाओस, मलेशिया, म्यानमार,फिलीपीन्स, सिंगापूर, थायलंड व व्हिएतनाम) ही राष्ट्रे व चीन, जपान आणि दक्षिण कोरिया) या गटाची स्थापना झाली आहे. या गटाने लागोपाठ तीन वर्षे शिखर परिषदेचे आयोजन करून दिशा दाखविणारा 'व्हिजन ग्रुप' स्थापन करून सदस्य राष्ट्रांच्या अर्थमंत्र्यांच्या नियमित बैठका घेण्यास सुरूवात केली आहे. प्रगत राष्ट्रांमध्ये 'जी-सात' या संघटनेचा कारभार जसा चालतो, त्याच धर्तीवर 'एसिआन + 3' चा कारभार करण्यात येत आहे.

जागतिक अर्थकारणात आशियातील राष्ट्रांचा प्रादेशिकवाद 'एसिआन + 3' च्या कृतीशीलतेमुळे डोकावू लागला आहे. अर्थात ही सुरूवात आहे. पण हा प्रादेशिकवाद व पश्चिमेकडील राष्ट्रांमधील प्रादेशिकवाद यात एक मूलभूत फरक जाणवतो तो म्हणजे, पूर्व आशियातील राष्ट्रे व्यापारापेक्षा आर्थिक मुद्यांवर लक्ष केंद्रित करीत आहेत. पश्चिमेकडील राष्ट्रांनी प्रथम व्यापाराला महत्त्व दिले होते. व्यापारात तडजोडी करून आर्थिक एकत्रीकरण करणे हे राजकीयदृष्ट्या कठीण व वेळखाऊ असते, पण त्या मानाने आर्थिक निर्णय जरा लवकर घेता येतात आणि या आर्थिक निर्णयांमध्ये व्यापाराप्रमाणे बाहेरील राष्ट्रांचा थेट संबंध नसतो, ही एक जमेची बाजू आहे.

आशियातील राष्ट्रे 'एशियन मॉनिटरी फंड' (AMF) स्थापन करण्याच्या प्रयत्नात आहेत. तीन वर्षांपूर्वी जपानने सुचविलेला हा प्रस्ताव चीनने फेटाळला होता. आता मात्र चीनने याच प्रस्तावाला पाठिंबा देण्याचे ठरविले

आहे. हॉंगकॉंग व फिलिपीन्स यांनी 'युरो' प्रमाणे आशियातील राष्ट्रांचे चलन एक असावे असे सुचविले आहे. अर्थात हे सर्व होण्यासाठी बराच कालावधी लागेल, पण त्या दृष्टीने विचार होतो आहे. व्यापारातही राष्ट्रे मागे नाहीत. व्यापारात अनेक बहुराष्ट्रीय करार होत आहेत. 'एसिआन फ्री ट्रेड एरिया' (AFTA) सुरू करून त्यामार्फत काही नवीन योजना आखण्यात येत आहेत. या सर्व आर्थिक व व्यापारी घडामोडींची नेमकी पार्श्वभूमी कोणती ते जाणून घेणे उपयुक्त ठरेल.

**पार्श्वभूमी**

पूर्व आशियातील प्रादेशिकवाद गेल्या दोन वर्षात कां उफाळून आला किंवा 'एसिआन + 3' च्या घडामोडींना वेग का आला याची काही कारणे आहेत. एक म्हणजे, १९९७-९८ मध्ये आशियातील राष्ट्रांवर आलेले आर्थिक संकट, दुसरे म्हणजे, मुक्त व्यापार करण्याच्या प्रक्रियेत जागतिक व्यापार संघटना आणि ॲपेक (APEC) यांच्या चर्चेतील अपयश, तिसरे म्हणजे, 'युरोपियन आर्थिक समुदाय' व 'युरो' यांच्या स्थापनेमुळे आशियातील राष्ट्रांमध्ये निर्माण झालेली एकीकरणाची प्रेरणा आणि चौथे म्हणजे, अमेरिका आणि युरोप यांनी आशियातील राष्ट्रांबाबत दाखविलेली एक प्रकारची उदासीनता. अर्थात यातील सर्वात महत्त्वाचे कारण म्हणजे आशियावर आलेले आर्थिक संकट हेच आहे. आणि आशियातील राष्ट्रे व्यापारापेक्षा आर्थिक बाजूवर लक्ष केंद्रित करीत आहेत याचे मुख्य कारणही आर्थिक संकट हेच आहे.

१९९७-९८ मध्ये आशियावर आलेल्या आर्थिक संकटाच्या वेळी पश्चिमेकडील राष्ट्रांनी आशियातील राष्ट्रांना कमी लेखले, अशी पूर्वेकडील बहुतांश नागरिकांची भावना आहे. तसेच या संकटात मदत करण्याऐवजी पश्चिमेकडील बँकांनी, गुंतवणूकदारांनी व कर्ज देणाऱ्यांनी आपापला निधी काढून घेऊन आर्थिक संकट अधिक तीव्र केले, असेही या राष्ट्रांचे मत आहे. अमेरिकेने थायलंडला मदत करण्याचे नाकारले, तर काही देशांसाठी त्यांनी अशाप्रकारे मदत केली की, ती मदत पूर्णपणे घेताच येणार नाही. याशिवाय आंतरराष्ट्रीय नाणेनिधी (IMF) आणि अमेरिका यांनी आर्थिक संकटाच्या वेळी अधिकारशाही गाजवून घेतली, असेही पूर्वेकडील राष्ट्रे म्हणतात. अर्थात हे आर्थिक संकट हा एक इतिहास झाला, आता भविष्यात मात्र असे संकट आले, तर पश्चिमेकडील राष्ट्रांवर अवलंबून राहण्याची वेळ येऊ नये, यासाठी हा आर्थिक प्रादेशिकवाद वाढविला जात आहे. आंतरराष्ट्रीय व्यापारात किंवा आंतरराष्ट्रीय आर्थिक संस्था यांच्या नियमांच्या विरूध्द जाऊन काही वेगळी कृती

करण्याची मात्र पूर्वेकडील राष्ट्रांची योजना नाही. आर्थिकदृष्ट्या पश्चिमेकडील राष्ट्रांच्या तुलनेत आपण कुठेही कमी पडत नाही, हे जगाच्या लक्षात आणून देण्याचा त्यांचा प्रयत्न आहे हे नक्की. (खालील तक्ता पाहावा.)

**अर्थशास्त्रीय परिभाषेनुसार तुलना (१९९७)**

| | उत्पादन | | (सर्व आकडे बिलियन डॉलर्समध्ये) | |
|---|---|---|---|---|
| | बाजार विनिमयदर | तौलनिक खरेदीशक्ती | उर्वरित देशांबरोबरचा व्यापार | अधिकृत वित्तसाठा |
| पूर्व आशिया | ६३८२ | ९४३१ | १३८० | ६६८ |
| युरोपीय राष्ट्रे | ८०९३ | ७५५९ | १६४० | ३८० |
| अमेरिका | ७८३४ | ७६६५ | १५८६ | ७१ |

(संदर्भ - द इकॉनॉमिस्ट १५ जुलै २०००)

## जागतिक व्यापार संघटनेचे अपयश

या आर्थिक एकीकरणामागे जागतिक व्यापार संघटनेची सिएटल येथील अयशस्वी ठरलेली परिषद हेही एक मोठे कारण आहे. पूर्वेकडील राष्ट्रे आर्थिक वाढीसाठी निर्यातीवर अवलंबून असून पश्चिमेकडील राष्ट्रांकडेच त्यांची निर्यात मोठ्या प्रमाणावर होऊ शकते आणि आर्थिक संकटांनंतर तर 'निर्यातीत वाढ' यावर त्यांना जास्त प्रमाणावर अवलंबून राहावे लागत आहे. अशा परिस्थितीत जागतिक व्यापार संघटनेच्या माध्यमातून मुक्त व्यापाराला चालना मिळाली नाही तर आपली निर्यात वाढणार नाही, अशी भीतीही पूर्वेकडील राष्ट्रांच्या मनात आहे. जागतिक व्यापार संघटनेच्या सिएटल येथील परिषदेच्या वेळी अमेरिका व युरोप येथील अनेक संस्था, संघटनांकडून मुक्त व्यापाराला विरोध करण्यात आला. भविष्यात तेथील संरक्षणवादाचे पारडे जड झाले तर चीन व जपानसहित अनेक पूर्वेकडील राष्ट्रे निर्यातीत मागे पडतील, त्यातून त्यांची अर्थव्यवस्था आणखी अडचणीत येऊ शकेल. तेव्हा वेळीच खबरदारी घेतलेली बरी, असेही कारण यामागे आहे.

जागतिक व्यापार संघटनेच्या अपयशाप्रमाणेच 'ॲपेक' (APEC)च्या माध्यमातून वाढणाऱ्या व्यापारालाही संरक्षणवादाची खीळ बसली आहे. याशिवाय अमेरिका आणि जपान यांच्यातील मतभेद तीव्र झालेले आहेतच. मुक्त व्यापारासाठी अमेरिकेचे काही मुद्दे (विशेषतः शेती, व शेतीसंबंधित उत्पादनाबाबतचे) जपान, दक्षिण कोरिया आणि चीनला मान्य नाहीत, तर श्रम आणि पर्यावरणाबाबतचे मुद्दे विकसनशील राष्ट्रांना मान्य नाहीत. या परिस्थितीत जागतिक व्यापाराचा वेग

मंदावणे स्वाभाविकच आहे.

वरील सर्व कारणांमुळे पूर्वेकडील राष्ट्रांनी आर्थिक एकत्रीकरणासाठी पावले उचलली असली तरी त्याचा अमेरिकेवर व युरोपमधील राष्ट्रांवर फारसा परिणाम लगेचच तरी होणार नाही, त्यामुळेच या घटनेकडे पश्चिमेकडील राष्ट्रांनी गांभिर्याने बघितलेले नाही.

**पूर्वेकडील राष्ट्रांच्या अंतर्गत अडचणी**

जागतिक अर्थव्यवस्थेवर परिणाम करू शकणाऱ्या पूर्वेकडील आर्थिक प्रादेशिकवादाला अंतर्गत अडचणींना सामोरे जावेच लागणार आहे. पूर्वेकडील सर्व राष्ट्रे ही सांस्कृतिकदृष्ट्या, राजकीयदृष्ट्या परस्परांपासून खूप वेगळी असून प्रत्येक राष्ट्राची आर्थिक प्रगतीही वेगवेगळी झालेली आहे. आर्थिक एकत्रीकरणासाठी जेवढी राष्ट्रे, तेवढ्या योजना पुढे येऊ शकतात, एवढी विविधता पूर्वेकडे आहे. अंतर्गत वादामुळे चीन व जपानमधील राजकीय वातावरणही या सर्व घडामोडींसाठी प्रतिकूल झालेले आहे. याशिवाय आग्नेय (दक्षिण-पूर्व) आशियातील राष्ट्रे 'एसिआन'मुळे एकत्र आलेली असली तरी ती एकमेकांकडे सहयोगी राष्ट्र या भूमिकेतून न बघता स्पर्धक म्हणूनच एकमेकांकडे बघतात. त्यामुळे पूर्वेकडील राष्ट्रांचे शेजारी राष्ट्रांबरोबर खूप सहकार्य करण्याचे धोरण आतापर्यंत तरी नव्हते, असे म्हणता येईल. पण आता ही परिस्थिती बदलू शकेल असे वाटते.

**जागतिक पातळीवर होणारे संभाव्य परिणाम**

पूर्वेकडील राष्ट्रांच्या आर्थिक प्रादेशिकवादाचे जागतिक पातळीवर काही परिणाम होऊ शकतात. अर्थात हे सर्व परिणाम लगेचच जाणवतील असे नाही, पण त्याचा विचार आत्तापासून करणे योग्य ठरेल.

चांगले परिणाम -१) युरोपमधील राष्ट्रांमध्ये जसे सख्य निर्माण झाले तसे सख्य चीन, जपान व इतर राष्ट्रांमध्ये निर्माण होऊ शकते. त्यामुळे या राष्ट्रांमधील शस्त्रस्पर्धा कमी होऊन स्थैर्य वाढू शकेल. २) जागतिक अर्थव्यवस्थेत व व्यापारात युरोपला व अमेरिकेला प्रतिस्पर्धी गट तयार झाला तरी यामुळे व्यापाराला, गुंतवणुकीला मोठी चालना मिळू शकेल. ३) जागतिक शांततेसाठी पूर्वेकडील राष्ट्रे एकत्रितरित्या चांगले प्रयत्न करू शकतील. ४) सर्व जागतिक घडामोडीमध्ये पूर्व व पश्चिम असा एक समतोल साधण्याचा प्रयत्न कायम होत राहील.

वाईट परिणाम - १) टोकाचा विचार केला तर पूर्वेकडील राष्ट्रे आर्थिकदृष्ट्या

फार बळकट झाली तर ती महत्त्वाकांक्षेपोटी विध्वसंक होण्याची भीती नाकारता येत नाही. २) ही राष्ट्रे पूर्वेकडील भांडवलबाजार स्थापन करून त्यावर आपले वर्चस्व ठेवतील आणि आंतरराष्ट्रीय वित्तीय संस्थांना जुमानणार नाहीत. ३) आपली सर्व धोरणे, योजना ती स्वतःच (पूर्वेकडील राष्ट्रे) ठरवतील व इतरांना आपल्या भागात प्रवेश देणार नाहीत. (युरोपमध्ये असे घडले आहे). ४) जागतिक व्यापार संघटनेच्या नियमांचे उल्लंघन त्यांना एकत्रितरित्या करता येईल. आणि पूर्वेकडील राष्ट्रांनी जर शिरजोरी केली तर पश्चिमेकडील राष्ट्रेही त्यांना चोख प्रत्त्युत्तर देतील. अशा खेळीत सर्वच राष्ट्रांनी एकमेकांना चिथवले, तर संरक्षणविषयक बाबींपासून आर्थिक व्यवहारापर्यंत सर्वांवर त्याचे परिणाम होतील.

**प्रादेशिकवादाचे भवितव्य सहकार्यावर अवलंबून**

असे प्रादेशिकवाद जगाला कोणत्या दिशेला घेऊन जातील ते आत्ताच सांगता येणार नाही. पण प्रादेशिकवादाचे जगात इतरत्र जसे परिणाम जाणवतात तसेच परिणाम या प्रादेशिकवादाचे जाणवू शकतात. पूर्वेकडील व पश्चिमेकडील राष्ट्रांनी सामंजस्याचे धोरण अवलंबिले तर त्याचे परिणाम वाईट नक्कीच होणार नाहीत. बहुतांश वेळा परस्परांची स्वायत्तता जपणे आणि अडी-अडचणीत सहकार्य करणे, असे धोरण सर्वच राष्ट्रांचे असावे लागेल.

एकमेकांचे सहकार्य मिळविण्यासाठी सर्वच राष्ट्रांना प्रयत्न करावे लागतील. सुस्पष्ट धोरण, विविध विषयांवर खुली चर्चा, समान संधी अशा मार्गांनी सर्व राष्ट्रांना जावे लागेल किंवा सध्याच्या जागतिक संस्थांचे कार्यक्षेत्र वाढवून त्या सक्षम कराव्या लागतील. अशा जागतिक संघटनांमध्ये, संस्थांमध्ये लोकशाही असायला हवी. राष्ट्रांना समान प्रतिनिधित्व मिळाले पाहिजे. कोण्या एका बाजूचा वरचष्मा किंवा दबाव असू नये, याची खबरदारी घ्यावी लागेल. पूर्व व पश्चिम अशा दोन्ही जगातील राष्ट्रांना आपापल्यापरिने हे प्रयत्न करावे लागतील. पश्चिमेकडील राष्ट्रांनी पूर्वेकडील राष्ट्रांचे प्रयत्न उचलून धरले पाहिजेत. त्यांना प्रोत्साहन दिले पाहिजे. त्यांचे म्हणणे ऐकून घेतले पाहिजे. तसेच पूर्वेकडील राष्ट्रांनीही संघर्षाची भूमिका न घेता समजूतदारपणे कृती केली पाहिजे. असे घडले तर पूर्व आशियाला जगात योग्य ते स्थान मिळेल व संपूर्ण जग आर्थिक स्थैर्याकडे वाटचाल करू शकेल.

■■

(संदर्भ - द इकॉनॉमिस्ट १५-२१ जुलै २०००.)

शिक्षण

# बालपण नसलेली मुले

अलिकडेच, युनिसेफचे दोन वार्षिक अहवाल आलेले आहेत. पहिला आहे तो 'द प्रोग्रेस ऑफ नेशन्स -२०००' हा; आणि दुसरा आहे, 'द स्टेट ऑफ वर्ल्डस् चिल्ड्रेन-२०००' हा. चालू शतक आणि चालू सहस्रक संपण्याच्या वर्षातले हे अहवाल असल्यामुळे त्यांच्याकडे जरा वेगळ्या दृष्टीने पाहणे शक्य आहे. शतकाच्या (किंवा सहस्रकाच्या) अखेरीला कोणते प्रश्न जगापुढे आहेत, हे जाणून घेणे सगळ्यांनाच आवडेल. त्या दृष्टीने आपल्या कृतिशीलतेलाही वळण लावता येऊ शकेल.

विसाव्या शतकाच्या अखेरीला जगातील बालकांची स्थिती नेमकी कशी आहे ? कोणत्या प्रश्नांच्या विळख्यात ती अडकलेली आहेत ? त्यांच्या प्रश्नांशी आपला काय संबंध आहे ? एकूणच या मुलांचे भवितव्य काय आहे? त्यांचा क्षीण आवाज जगभर कसा ऐकला जाईल ?

युनायटेड नेशन्सचे सेक्रेटरी-जनरल कोफी अन्नन यांनी 'द स्टेट ऑफ द वर्ल्ड चिल्ड्रेन २०००' या अहवालातून आपणा सर्वांनाच आवाहन केले आहे. सर्वांनाच म्हणजे सरकारे, नागरी समाज, खाजगी क्षेत्र आणि संपूर्ण आंतरराष्ट्रीय समाज. श्री. कोफी म्हणतात, "एकविसाव्या शतकाच्या उंबरठ्यावर, एक नवी दृष्टी घेऊन बालकांचे हक्क अबाधित ठेवण्यासाठी कटिबद्ध झाले पाहिजे. प्रत्येक बालकाच्या जीवनाची सुरूवात निरोगी झाली पाहिजे, प्रत्येक बालकाला दर्जेदार शिक्षणाचा लाभ झाला पाहिजे आणि प्रत्येक युवक-युवतीला त्यांच्या खास क्षमतांनुसार विकासाच्या संधी उपलब्ध झाल्या पाहिजेत. यासाठी हे आवाहन प्रत्येक कुटुंबाला, प्रत्येक समाजगटाला आणि प्रत्यक्षात त्या बालकांना नि युवकांना करण्यात येत आहे की या बालकांचा आवाज सर्वत्र घुमला पाहिजे; नि त्यांच्या दैनंदिन जीवनात त्याचे प्रतिबिंब उमटले पाहिजे"

विसाव्या शतकाच्या अखेरीस, जगातील बालकांची अवस्था कशी आहे? लक्षावधी बालकांचे जीवन दारिद्रयात खितपत पडले आहे, लाखो बालकांना आर्थिक नि सामाजिक संघर्षांना तोंड द्यावे लागत आहे, तर जगातील

लहान-मोठी युद्धे हजारो बालकांचे जीवन उध्वस्त करीत आहे. आणि नवा जागतिक कर्दनकाळ एच आय व्ही / एडस्‌ने तर हजारो बालकांना पोरके करून टाकले आहे.

जागतिक बँकेचा 'ह्युमन डिव्हलपमेंट रिपोर्ट' हा अहवाल दाखवून देतो की जगातील ६० कोटी बालके दारिद्र्यरेषेखालील जीवन जगताहेत आणि त्याची कारणे, गेल्या दशकात घडलेल्या अर्थबदलात शोधता येतील. या शतकाच्या अखेरीच्या दशकात जगातील चाळीस देशांचे सरासरी दरडोई उत्पन्न तीन टक्क्यांनी वाढले आहे. परंतु त्याचवेळी ५५ देशांचे हे उत्पन्न घटले आहे आणि ८० देशांमध्ये तर लोकांचे दरडोई उत्पन्न दशकापूर्वीच्या उत्पन्नापेक्षाही खाली गेले आहे. जगात विषमता तर खूपच वाढली आहे आणि ती पुढे वाढतेच आहे. आजच आर्थिकदृष्ट्या सगळ्यात खालच्या स्तरावर असलेल्या वीस टक्के लोकसंख्येच्या ७४ पटीने जास्त उत्पन्न सर्वात वरच्या स्तरावरील वीस टक्के लोकसंख्येस प्राप्त होते. अलीकडची नवी घटना अशी की सर्वात श्रीमंत देशांमधील बारा टक्के जनता गरिबीने गांजली आहे.

एच आय व्ही/एड्‌स्‌ने १९९८ साली १५ वर्षाखालील पाच लाखापेक्षाही जास्त मुलांचा बळी घेतला आहे, आणि आज अंदाजे या वयोगटातील एक कोटीपेक्षा अधिक मुले एडस्‌ग्रस्त झाली आहेत. १५ ते २४ हा वयोगट या रोगाला बळी पडण्याची शक्यता जास्त असते; आणि आज या वयोगटातील एक कोटी मुले एडस्‌ग्रस्त आहेत. या रोगाचे प्रमाण मुलांपेक्षाही मुलींमध्ये अधिक आढळून आले आहे. उदाहरणार्थ, काही देशांमधून १५ ते १९ या वयोगटातील एडस्‌ग्रस्त मुलींचे प्रमाण मुलांपेक्षा ३ ते ६ पटींनी जास्त आहे. एडस्‌ग्रस्त आई-बापांच्या निधनामुळे पोरक्या होणाऱ्या मुलांची एक वेगळीच समस्या अलीकडे निर्माण झाली आहे. अशी सुमारे दीड कोटी मुले आज आहेत.

सर्वच मुलांना योग्य वयात योग्य दर्जाच्या योग्य शिक्षणाची संधी मिळायला हवी हे तत्वत: आता सर्व जगानेच मान्य केले आहे. प्राथमिक शिक्षण सक्तीचे व्हावे नि ते मोफत मिळावे याची जबाबदारी सरकारने स्वीकारली पाहिजे या दिशेने प्रयत्न चालू आहेत. तरीही विकसनशील राष्ट्रांमधील सुमारे १३ कोटी मुले प्राथमिक शिक्षणापासून वंचित आहेत; हे विसाव्या शतकाने आपल्यासमोर ठेवलेले तातडीचे आव्हान आहे. या एवढ्या मोठ्या संख्येत, अर्थातच मुलींचे प्रमाण ६० टक्क्यांपेक्षाही जास्त आहे. मुले आणि मुली यांच्या शिक्षणामधील हे संख्यात्मक अंतर शिक्षणाच्या वरच्या स्तरांवर वाढतच जाते. या शिक्षणापासून वंचित असलेल्या बालकांपैकी सुमारे अडीच कोटी मजुरी करतात. कित्येकदा अनेक मुले अत्यंत धोक्याच्या उद्योगातून नि अनारोग्यकारक वातावरणात काम करीत असतात. ना आरोग्य ना शिक्षण अशा अवस्थेतील या

मुलांचे जीवनही धोक्याचे असते.

जगातील ५४ कोटी मुले युद्धाच्या खाईत पोळली जात आहेत. त्यांना अत्यंत अस्थिर व ताणाचे जीवन जगावे लागत आहे. काही देशांमधून तर अगदी दहा वर्षांची मुले ही शासन किंवा त्यांच्याविरोधी युद्धातुर गट, सैन्यात भरती करताना आढळतात. वास्तविक पाहता बालकांना लढाईपासून वाचविण्याचे आवाहन १९०९ सालापासूनच जगभर होत आहे. तरीही गेल्या दशकात युद्धात सुमारे २० लाख मुले मारली गेली. ४० ते ५० लाख अपंग झाली आणि १ कोटी २० लाख मुले बेघर झाली. भूकंप, पूर, दुष्काळ अशा नैसर्गिक आपत्तींमध्येही जास्त हाल होतात ते लहान मुलांचे.

शतकाभरच्या प्रयोग, प्रसार, प्रचाराच्या प्रयत्नांनंतर जग आता, नव्या शतकाला सामोरे जाताना, बालशिक्षणाचा म्हणजे अल्पवयातील बालकांच्या शिक्षणाचा विचार तत्वत: स्वीकारतांना आढळत आहे. मानवी विकासाचा केंद्रबिंदू, अल्प वयातील मुलांच्या पोषण-शिक्षणात आहे हे आता ध्यानी येऊ लागले आहे. विसाव्या शतकातील जगाची भाषा 'आर्थिक लाभा'चीच राहिली आहे. याच भाषेत बोलायचे तर असे म्हणता येईल की शालेयपूर्व वयातील मुलांच्या आरोग्य-शिक्षणावर केलेल्या गुंतवणुकीवरील अपेक्षित लाभाचे प्रमाण १ : ७ असे आहे. दरवर्षी सुमारे सव्वा कोटी बालके जन्माला येतात हे गृहित धरले तर हे लाभाचे प्रमाण, भावी जगासाठी किती प्रचंड आहे हे लक्षात येईल.

शालेयपूर्व पोषण-शिक्षणाचे महत्त्व आहे ते सारा समाज दारिद्र्याच्या नि विषमतेच्या खाईतून वर काढण्यासाठी. बालवयात घेतलेल्या काळजीमुळे मुलांची होणारी निकोप शारीरिक व भावनिक वाढ गरिबीचे विषमतेचे, नि विषेशत: स्त्री-पुरूष विषमतेचे दुष्टचक्र भेदू शकेल असे मत युनिसेफचे कार्यकारी संचालक कॅरोल बेलमी यांनी, 'द प्रोग्रेस ऑफ नेशन्स -२०००' या अहवालात नमूद केले आहे. वयाच्या आठ वर्षापर्यंतच्या, जगातील सुमारे १०० कोटी मुलांना, पोषक आहार, आरोग्य व मानसिक स्वास्थ्य यांची शिदोरी देणे म्हणजेच त्यांची काळजी घेणे होय. बालकेंद्री विचारांनी भरलेली घरे, शुद्ध पाणी व इतर प्राथमिक आरोग्य सुविधांची उपलब्धता, महिलांना आरोग्य व विकासाच्या मिळणाऱ्या संधी व त्यातून त्यांचे झालेले शारीरिक व बौद्धिक-भावनिक पोषण या साऱ्यांतून होणारी त्यांची बालसंगोपनाची तयारी आणि लहान बालकांना दिल्या जाणाऱ्या खेळांतून, आनंददायी शिक्षणाच्या भाषा विकासाच्या संधी यांतून बालकांची नवी सतेज पिढी उभी राहणार आहे, असेच आपले मत कॅरोल बेलमी यांनी प्रतिपादन केले आहे.

अगदी लहान वयात होणाऱ्या शारीरिक व बौद्धिक कुपोषणाच्या परिणांमाची जाणीवही अहवालात कॅरोल बेलमी यांनी करून दिली आहे. यामुळे खूप मोठ्या प्रमाणावर होणारे नुकसान टाळणे शक्य आहे. आणि त्यासाठी वेळ, श्रम, साधने यांची सुरूवात बालकांमध्ये अगदी अल्पवयापासून (अगदी जन्मापासून किंवा खरे तर त्याही पूर्वीपासून) करणे योग्य आहे. पुढे यातूनच मानवी विकासाचे मोठे लाभ मिळविता येतील हे त्यांनी अधोरेखित केले आहे. त्यासाठी पायाभूत सुविधा निर्माण करणे आणि गरीब समाजाला या प्रयत्नात सहभागी करून घेणे यानेच लहानग्यांना त्यांच्या जीवनाची सुरूवात दमदारपणे करून देणे शक्य होणार आहे.

■■

*काव्यात्म, आध्यात्मिक, वैचारिक सर्जनशीलतेचे माध्यम म्हणून भाषा कार्य करते, आणि जिने शैशवांपासून आपली सोबत केली आहे त्या स्वभाषेत ही सर्जनशीलता विशेष फुलते. असे का होते ? भाषा ही केवळ विचार, भावना, इच्छा एकमेकाला कळविण्याचे म्हणजे परस्परसंवादाचे किंवा विसंवादाचे संज्ञापन साधन (मीन्ज ऑफ कम्युनिकेशन) आहे हे तर खरेच. पण भाषा आणखीही काही आहे. आपले मनोगत आपले आपल्याला कळवून घेण्याचे आणि आपल्या आकलनाला आकार देण्याचे कामही ती करते, महणजेच भाषा ही ज्ञान माध्यम(मीडीयम ऑफ कॉग्निशन)सुध्दा आहे. आपला आपल्याशी अखंड संवाद किंवा विसंवाद चाललेला असतो. पुष्कळदा तो मनातल्या मनात चालतो खरा; पण तोही बऱ्याच अंशी भाषेतूनच. भाषेचे संज्ञापनाच्या अंगाने जागतिकीकरण होतांना केंद्रीकरणाला त्यातल्या त्यात अधिक महत्त्व येते. संपर्क भाषेचे कार्य यासाठीच चालते. परंतु भाषेचे ज्ञान-माध्यम म्हणून जागतिकीकरण होताना विकेंद्रीकरणाला अधिक महत्त्व येते. अभिव्यक्ती स्वभाषेत करून अनुवादामार्फत जागतिकीकरणाच्या क्रियेत या दोन प्रेरणांचा मेळ सुयोग्य रीतीने घालण्यात सर्वांचे हित आहे. कोणत्याही टोकाला जाण्यात कुणाचेच हित नाही, उलट हानीच आहे.*

*अशोक केळकर*

*संदर्भ - 'भाषेचे जागतिकीकरण आणि जागतिकीकरणाची भाषा' (भाषा आणि जीवन, वर्ष १८, अंक २)*

दृष्टिक्षेप

# नव्या शतकातील नव्या कल्पना

एकविसावे शतक हे विज्ञानातील प्रगतीने गाठलेले अत्त्युच्च शिखर असेल, असे बरेचदा म्हटले जाते. आजवरच्या वैज्ञानिक नि तांत्रिक प्रगतीमुळे अनेक सुखसोयी व सुविधा मानवाला मिळाल्या असल्यातरी त्यातून अनेक गुंतागुंतीच्या प्रश्नांनाही मानवी समूहाला सामोरे जावे लागत आहे. अनेक क्षेत्रांतील अशा प्रगतीकडे व प्रश्नांकडे वेगळ्या दृष्टीने पाहून त्यात नेमके काय काय होण्याची शक्यता आहे याचा वेध 'बिझिनेस वीक' आणि 'टाईम' या नियतकालिलांनी घेतला आहे. गांभीर्य आणि गंमत या दोन्ही अंगाने विचार करणाऱ्या ' या लेखातील काही भागांचे हे संकलन.

**१) अनेक राष्ट्रांचा उदय** - नव्या शतकात राष्ट्रवादाला प्राधान्य मिळून अनेक नवी राष्ट्रे उदयास येण्याची शक्यता आहे. अनेक देशांचे विघटन होण्यासाठी इंटरनेट आणि जागतिक अर्थव्यवस्था हे दोन घटक प्रामुख्याने कारणीभूत ठरतील. इंटरनेटमुळे जग एक न होता त्यातून राष्ट्रवादाची भावना पसरविली जाण्याची शक्यता अधिक आहे. मुक्त व्यापारामुळे छोटे देश आपल्या व्यापारी शक्तीवर लक्ष केंद्रित करतील. अर्थात नव्या राष्ट्रांचा उदय हा शांततेच्या मार्गातून होईल असे नाही. त्यासाठी संघर्ष, हिंसाचार होऊ शकतो.

**२) राजकारण** - राजकारणाच्या क्षेत्रात लोकशाहीला जास्त महत्त्व मिळेल. अनेक राष्ट्रांमध्ये इंटरनेटच्या माध्यमातून लोकशाही राबविली जाईल. निवडणुकांच्या पध्दती बदलू शकतील.

**३) धर्म-** मानवाने कितीही आर्थिक व वैज्ञानिक प्रगती केली तरी काही प्रश्न अनुत्तरित राहतात. तेव्हा माणूस धर्माचा आधार घेतो. एकविसाव्या शतकात धर्माकडे झुकण्याची माणसाची प्रवृत्ती आणखी वाढेल. धर्म व विज्ञान, अध्यात्म व विज्ञान अशी सांगड घालण्याचा प्रयत्न होत राहील. विज्ञानामुळे अनेक घटना अशा अशा प्रकारे होतात, हे स्पष्ट होत जाईल. पण ते तसेच का होते याचे उत्तर कधी मिळेल तर कधी नाही. म्हणून विश्वरचनेचे गूढ जाणून घेण्यासाठी धर्माचा आधार घ्यावाही लागेल.

**४) नोकऱ्यांचे बदलते स्वरूप** - विज्ञानाच्या नवनवीन शोधांमुळे व

इंटरनेटच्या वापरामुळे काही नव्या प्रकारच्या नोकऱ्यांची गरज भासेल तर काही नोकऱ्या, पदे कालबाह्य ठरू शकतील. मानवी शरीरातील खराब झालेली अनेक अंतर्गत इंद्रिये (उदा. मूत्राशय, आतडे, यकृत इ.) बदलली जाऊ शकतील. त्यामुळे टिश्यू इंजिनिअरिंग हे नवे क्षेत्र विकसीत होईल. जीन्स ओळखण्यासाठी व त्यात बदल करण्यासाठी जीन्य प्रोग्रामर्स, संगणकाशी संबंधित कामे करणाऱ्या व्यक्तींची गरज वाढेल. थोडक्यात, विज्ञान व तंत्रज्ञानाशी संबंधित नोकऱ्यांचे प्रमाण वाढेल, तर संगणकाच्या मदतीने व इंटरनेटवरून शिक्षण उपलब्ध झाले तर शिक्षक, कंपनीतील व कार्यालयातील स्टेनोग्राफर्स, अनेक क्षेत्रात काम करणारे मध्यस्थ, यांत्रिकीकरण वाढल्याने घरगुती काम करणारा सेवकवर्ग अशा नोकऱ्या संपुष्टात येतील.

५) **व्यवस्थापन** - औद्योगिक क्षेत्रातील महत्त्वाचा घटक असलेल्या व्यवस्थापनाच्या पद्धतीत अनेक बदल होतील. नेतृत्वाला असलेले महत्त्व कमी होऊन 'टीम'ला महत्त्व मिळेल. यावेळी सहकार, सहयोग, सहमती यांना प्राधान्य देण्यात येईल. सर्व प्रकारची माहिती सर्व कर्मचाऱ्यांपर्यंत पोचून निर्णयप्रक्रियेत सर्व घटकांचा सहभाग असेल अशा पद्धती रूढ होण्याची शक्यता आहे.

६) **दूरसंचार** - अत्याधुनिक उपकरणांमुळे सर्व प्रकारचा संवाद, विचारांची देवाण-घेवाण ही इंटरनेटचा वापर करून केली जाईल. संगीतदेखील इंटरनेटवरून ऐकले जाईल, जगाच्या कुठल्याही कोपऱ्यात कोणत्याही वेळी संपर्क साधता आल्याने 'घराबाहेर' पडून कामे करण्याचा वेळ वाचेल. दुकानात जाणे, सामान आणणे, शुभेच्छा कार्ड पाठविणे, परगावी पैसे पाठविणे अशी सर्व कामे आता सहजपणे घरबसल्या होतील.

७) **पैसा** - नव्या सहस्रकात पैशाचे / नोटांचे महत्त्व कमी होऊ शकेल. क्रेडिट कार्ड प्रकारामुळे रोख पैसा जवळ बाळगण्याची गरज भासणार नाही. तसेच पैशाचे व्यवहार इंटरनेटमार्फत होतील. बँकांनाही ग्राहकांकडून तशा सूचना मिळतील. 'इ-कार्डस्' , 'डिजिटल मनी' असा नवा प्रकार अस्तित्वात येण्याची शक्यता आहे. या संदर्भात सर्वेक्षण केले असता असे आढळले की पैशाच्या बाबतीत कोणत्याही प्रकारचा धोका पत्करण्याची नागरिकांची तयारी नसते. प्रत्यक्ष हातात दिसणाऱ्या नोटांवर व त्यामुळे झालेल्या आर्थिक व्यवहाराला एक विश्वास किंवा सच्चेपणा प्राप्त होतो, तो इतर कशाने मिळत नाही. पण 'क्रेडिट कार्ड'ने हा विश्वास बऱ्याच प्रमाणात मिळविण्याचा प्रयत्न केला आहे. 'डिजिटल मनी' व 'ई-कार्डस्', चा वापर सुरू झाल्यावरच त्याला विश्वासार्हता मिळेल. यात एक महत्त्वाचा विचार असा

चालू आहे की यापुढील काळात, पैसा हा 'सार्वत्रिक' असणार नाही, तो वैयक्तिक असेल. म्हणजे, ज्या वेबसाईटकडून तुम्हाला खरेदी करायची असेल, त्या वेबसाईटचे चलन वापरण्याची सोय उपलब्ध होऊ शकेल. उदाहरणार्थ, 'ॲमेझॉन डॉट कॉम' साठी ॲमेझॉन डॉलर असे व्यावहारिक पातळीवर होईल का ? याचाही शोध घेण्यात येत आहे. बीन्झ डॉट कॉम (beenz.com) या साईटवर बीन्झ वापरण्याची सोय आहे. अर्थात त्याचा कुठेतरी डॉलरशी संबंध आहेच. (200 beenz = 1 डॉलर) हा सर्व प्रकार कितपत उपयुक्त ठरू शकेल, त्याचे फायदे-तोटे काय असतील, याचा सर्वंकष विचार होऊन ते प्रत्यक्षात उतरायला वेळ लागेलच, पण तरी असे काही तरी होण्याची शक्यता आहे.

**८) ऊर्जा** - भविष्यात उर्जेची गरज वाढेल, ऊर्जा सर्वांना मिळेलही, पण ती आतापर्यंत मिळत असलेल्या पद्धतीने नव्हे तर प्रत्येकाला खाजगीरीत्या मिळेल. ऊर्जा तयार करण्यासाठी लागणारे घटकही बदलले जाण्याची शक्यता आहे. मोठी मोठी ऊर्जाकेंद्रे कालबाह्य होऊन खाजगी व छोटी छोटी ऊर्जाकेंद्रे निर्माण होण्याची शक्यता आहे. प्रत्येकाकडे आत येणारी व बाहेर जाणारी ऊर्जा नोंद करण्यासाठी मीटर्स असतील. घरातील अतिरिक्त ऊर्जा पुन्हा मोठ्या 'ग्रीड'मध्ये परत पाठविण्याची सोय असेल. सौर ऊर्जेचे महत्त्व वाढून प्रत्येकाला ती आपल्या आवश्यकतेप्रमाणे तयारही करून घेता येईल. एखाद्या व्यक्तीकडे जास्तीची ऊर्जा असेल तर त्याला ती खाजगीरित्या दुसऱ्याला विकतही देता येईल.

**९) पर्यावरण** - पुढील काही वर्षात पर्यावरण रक्षणासाठी विशेष प्रयत्न करण्यात येतील. खरे म्हणजे विसाव्या शतकाअखेरीस हे प्रयत्न सुरूही झाले आहेत. त्यातून झाडे लावणे, वाढविणे, हवा प्रदूषित होऊ न देणे, यासाठी प्रयत्न करण्यात येत आहेत, पण ते पुरेसे नाहीत. जंगले वाचविणे महत्त्वाचे आहे, त्याप्रमाणे वन्यजीवन वाचविणेही अत्यावश्यक ठरणार आहे. 'जीवो जीवस्य जीवनम्' ही नैसर्गिक अन्नसाखळी तुटायला लागली आणि वन्य जीवांना त्यांची शिकार जंगलाबाहेर शोधायची वेळ आली तर मानवी जीवनालाच धोका पोहोचेल. निसर्गातील विविधता टिकविणे याला प्राधान्य द्यावे लागणार आहे.

**१०) लोकसंख्या** - जगाची वाढती लोकसंख्या हा एक गंभीर प्रश्न समजला जातो. या प्रश्नाबाबत जागरूकता निर्माण होऊनही बऱ्याच वर्षांचा कालावधी लोटला आहे. तरीदेखील आज अनेक देशांमध्ये हा प्रश्न दोन तऱ्हेने कायम आहे. भारत, पाकिस्तान, बांगला देश यांसारख्या देशांना लोकसंख्या वाढते आहे

म्हणून काही प्रश्नांना सामोरे जावे लागत आहे, तर युरोपमधील काही देशांमध्ये जन्मदर घटणे व त्यामुळे पुरेसे सक्षम मनुष्यबळ नसणे हा प्रश्न निर्माण झाला आहे. औद्योगीकरणापेक्षा शेती हे उदरनिर्वाहाचे प्रमुख साधन असल्याने कुटुंब-नियोजनाची गरज भासत नव्हती. तसेच कुटुंबनियोजनाच्या साधनांचा शोध लागून त्याचा वापर होणे, असेही मोठ्या प्रमाणावर घडलेले नव्हते. हळूहळू औद्योगीकरण, शहरीकरण वाढले व राहणीमानाच्या कल्पना बदलू लागल्या आणि कुटुंबनियोजन मोठ्या प्रमाणावर होऊ लागले. चीनने फार पूर्वीपासूनच 'एक कुटुंब एक मूल' हे धोरण स्वीकारले. लोकसंख्या जास्त असलेल्या देशांना भविष्यात हे धोरण स्वीकारणे कदाचित भाग पडेल. छोट्या कुटुंबामुळे जे काही कौटुंबिक, सामाजिक प्रश्न निर्माण होतील त्यांची सोडवणूक हे भविष्यातील एक आव्हान ठरेल. प्रामुख्याने वृध्दांची संख्या वाढलेली असेल, त्यामुळे त्यांची काळजी घेणे हा एक मोठा सामाजिक उपक्रम ठरू शकेल. लोकसंख्येच्या संदर्भात संख्यात्मक, की दर्जात्मक हा प्रश्न महत्त्वाचा ठरणार आहे.

**११) रंगसूत्रे /गुणसूत्रे (जीन्स)** - आनुवंशिकतेसंबंधीच्या अनेक नवनवीन बाबी मानवाला समजून घेता आल्याने भविष्यातील आई-वडील आपल्यामधील व्याधी, दुर्गुण टाळून अपत्याला जन्म देऊ शकतील. नवीन पिढी चांगल्या आरोग्याची निपजावी यासाठी प्रयत्न केले जातील. क्लोनिंगचे शास्त्र आणखी विकसित होईल. असे सर्व शोध मानवाला कुठे नेतील याचे उत्तर काळच देऊ शकेल.

**१२) कृत्रिम बुद्धिमत्ता** - मानवाने अनेक यंत्रे निर्माण केली. संगणक हे यापैकी एक महत्त्वाचे यंत्र. पण आजही संगणकाला माणसाइतकी बुद्धिमत्ता नाही. संगणकामध्ये मानवी बुद्धी अंतर्भूत करण्यासाठी मेंदूत कोणकोणती रसायने असतात त्याचा शोध घेतला जात आहे, रसायनांचे असे मिश्रण इलेक्ट्रॉनिक सर्किटमध्ये आणण्याचे प्रयत्न यशस्वी झाले तर कृत्रिम बुद्धिमत्तेचे दालन खुले होण्याची शक्यता आहे. यातून अनेक फायदे होतीलही पण अशी यंत्रे मानवापेक्षा जास्त हुशारी दाखवू लागली तर...... ही भीतीही शास्त्रज्ञांच्या मनात आहे.

**१३) शिक्षण** - बालशिक्षण व प्राथमिक शिक्षणाला महत्त्व देण्यात येऊन कदाचित उच्च माध्यमिक शिक्षण (म्हणजे ८वी तो १०वी) कालबाह्य ठरण्याची शक्यता आहे. आजकालचे विद्यार्थी अनेक गोष्टी लहान वयात समजून घेऊ शकतात (?) असे काहींचे मत आहे. तेव्हा मुलांना महाविद्यालयीन शिक्षण लवकर म्हणजे वयाच्या १४व्या वर्षीच सुरू करता येईल का यावर विचार होईल. काही विचारवंतांच्या मते महाविद्यालयांची गरज भासणार नाही, पण प्रत्येक

विषयाचे शिक्षण देणाऱ्या वेगवेगळ्या संस्था निर्माण होतील.

**१४) जीवनपद्धती** - एकविसाव्या शतकात सर्वात गंमतशीर ठरणार आहे ती मानवी जीवनपद्धती. काळ, काम, वेगाचे चक्र अतिशय गतिमान होणार आहे. माणसाचा प्रवास हा अधिक वेगाने होणार आहे आणि तो अधिक वाढणारही आहे. जग 'एक खेडे' होण्याकडे वाटचाल करीत असल्याने, पूर्व ते पश्चिम हे अंतर काही तासातच कापले जाईल. व्यापार वाढल्याने माणसांचा प्रवास वाढेल. कार्यालय अमेरिकेत किंवा चीनमध्ये व कर्मचारी जगभर असे विखुरलेले चित्र आढळू शकते. सकाळी अमेरिकेत, दुपारी आशियात व रात्री चीनमध्ये इतकी गती आली तर रोजचा जीवनक्रम, खाण्यापिण्याच्या, झोपण्याच्या वेळा यात खूप बदल होत जाईल. आहारविहाराच्या कल्पना बदलतील. खाण्याचे सर्व पदार्थ सर्वत्र उपलब्ध होतील. जीवनातील विविधता कमी होईल आणि जगात सर्वत्र एकच 'कामाची संस्कृती, व्यापारी संस्कृती' राहील. सतत विमानाचा प्रवास केल्यामुळे 'मी कुठे आहे?' असा प्रश्न विचारून दिवसाची सुरूवात करावी लागेल. अर्थात सर्वांच्याच बाबतीत हे घडेल असे नाही. पण अनेकांना या मार्गाने जावेही लागेल.

यामुळे एका व्यक्तीजवळ ३०-४० देशांचा व्हिसा असेल. त्याचे नागरिकत्व कागदोपत्री एखाद्या देशाचे राहील, पण त्याचा संचार सर्वच देशांमध्ये असू शकेल. बंजारा जमात ही जशी भटकी जमात आहे तशीच एक भटकी जमात पुन्हा तयार होईल. यातून अनेकविध सामाजिक, कौटुंबिक प्रश्न निर्माण होऊ शकतील. आरोग्याच्या काही नवीनच प्रश्नांनाही सामोरे जावे लागेल. लोकांची जीवनपद्धती जसजशी बदलत जाईल तसतशी स्थानिकांच्या कामाची वेळही बदलत जाईल. मोठ्या शहरांमधील हॉटेल्स २४ तास उघडी राहतील. रात्री १२ वाजताही त्यांना कुणासाठी सकाळचा नाश्ता तर कुणासाठी सकाळचे जेवण तयार ठेवावे लागेल. अनेक कार्यालयांना दिवसपाळी व रात्रपाळी अशा कामाच्या वेळा ठरवाव्या लागतील.

नव्या शतकातील बदलांकडे हा एक धावता दृष्टिक्षेप. काही क्षेत्रात विज्ञानाचा अतिरेक, कुठे वेळेचे बंधन नाही, तर कुठे थांबायचे बंधन नाही असे काहीतरी घडण्याची चिन्हे मात्र दिसत आहेत. माणसाच्या प्रगतीचे हे चक्र नव्या शतकात फार वेगाने फिरणार की त्याची गती हळूहळू कमी होणार याचे उत्तर काळच देऊ शकेल !

■■

(पान क्र. २ वरून)
परस्परहितसंबंधियांचे संघर्ष चालूच राहणार आहेत, नव्हे चालू आहेत.

जागतिकीकरणाची प्रक्रिया साकार करणाऱ्या जागतिक बँक, आंतरराष्ट्रीय नाणेनिधी, जागतिक व्यापारी संघ या संस्था आहेत. वर उल्लेखित संघर्ष हा सध्यातरी, तिसऱ्या जगातील नवमुक्त राष्ट्रे व या सर्वांना गेले दीड शतक, काही ठिकाणी त्याहून अधिक काळ गुलामीत ठेवणारी राष्ट्रे यांच्यात चालू आहे. हा लढा येत्या काही वर्षांत अधिकाधिक तीव्र होईल. हा लढा कोठवर चालेल ? बड्यांची दादागिरी संपेपर्यंत, तसेच लोकशाही, शांतता, सर्व राष्ट्रांना समान संधी व उत्कर्षाला वाव मिळेपर्यंत! हे येत्या काही वर्षांत होणारच आहे, कारण मानवी समाजाच्या प्रारंभापासून सुरू झालेला वर्गसंघर्षाचा व भेदाभेदाचा मूळ रोग पूर्ण नष्ट करण्याचा काळ आता चालू झाला आहे. तो चालू झाला आहे हे म्हणणे तितकेसे बरोबर नाही, सुरू होऊन बराच काळ लोटला आहे व आता तो अंतिम टप्प्यात येत आहे. एकविसाव्या शतकाअखेर सामाजिक जीवनातील भेदाभेदीची, दादागिरीची, अन्याय-दहशतीची कुरूपता नष्ट केली जाणार आहे. लोकशाही व सर्वांचा विकास यांवर आधारलेल्या जागतिकीकरणाची प्रक्रिया पूर्ण होउन "जय जगत्" ही आचार्य विनोबांची वाणी खरी ठरणार आहे.

अन्याय व तत्सम बाबी जणू जागतिकीकरणामुळे सुरू झाल्या हे म्हणणे योग्य नाही. त्यामुळे आपण नेमकी उलटी दिशा घेतो. आपण 'ऐवजी' व 'पर्याय' शोधण्याचा अट्टाहास करतो व ज्या क्रमातून मानवसमाज गेली हजारो वर्षे, लाखो वर्षे गेला, तेच क्रम त्याने पुन्हा सुरू करावेत असे गंभीरपणे सुचवितो. स्थानिक, प्रादेशिक वाटचालीतूनच मनुष्य जाऊन येथवर आला ना ? प्रौढ व्यक्तीने पुन्हा रांगायला लागावे असे सांगण्यापैकी हे आहे. स्थानिक तळागाळातील लोकांनी निर्णय प्रक्रियेत भागिदारी करावी ह्या दृष्टीने पंचायत राज्य विधेयक आहे. ती प्रक्रिया बळकट करायला हवी.

आंतरराष्ट्रीयवाद म्हणजे नक्की काय ? 'जगातील सर्व मनुष्यप्राण्यांचे हित एक' या भावनेची जोपासना ! असे मानणे म्हणजेच समाजातील संघर्ष युगानुयुगे चालू आहे व त्याचे आदिकारण माणसांच्या विविध विभागातील परिस्थितीजन्य (हितसंबंधांमुळे तयार झालेले) वैरभाव आहे हे सत्य पूर्ण नजरेआड करणे होय, असे मला वाटते.

तसेच, तुमच्या संपादकीयमधील एका विधानाबाबत- तुम्ही म्हटले आहे, "जागतिकीकरणातून होणाऱ्या विकासाची वाट बघण्यापेक्षा आपणच आपला

विकास साधावा ही जाणीव वाढली पाहिजे". जागतिकीकरणाची "वाट" पाहायची हे काय आहे? ते आजचे वास्तव आहे. विसाव्या शतकाची अखेर हे जितके वास्तव आहे तितकेच. जागतिकीकरणामुळे विकासच होणार आहे असे कोणी सांगितले? तिसऱ्या जगातील राष्ट्रांचा विकास रोखावा अशी पक्की योजना आखलेल्या शक्ती जागतिकीकरणात आहेत व त्यांचे प्रयत्न चालू आहेत. ते प्रयत्न उधळून टाकणे हे आपले काम आहे. ते ही चालू आहे. 'नाम' चळवळ त्याचसाठी जन्माला आली व आज लढत आहे. सिएटल व वॉशिंग्टन येथे त्याचा प्रत्यय आलाय हा लढा आणखी तीव्र करणे व त्यात न्यायाची निखळ बाजू ठामपणे घेणे हे आपले काम आहे. या लढ्यास, सुदैवाने, जागतिक परिस्थिती पोषक आहे.

वि. ग. फाटक, मुंबई.

**आपल्या** सप्टेंबर-ऑक्टोबरच्या अंकातील 'पहिलीपासून इंग्रजी' हे टिपण वाचले. इंग्रजी भाषा व्यवहाराचे माध्यम म्हणून भारतात वापरण्याच्या मी विरूद्धच आहे. त्यामुळे शिक्षणाचे माध्यम मातृभाषा अथवा त्या त्या राज्याची भाषा असावी, या मताचा मी आहे परंतु गेल्या ५० वर्षात सर्व विषयांच्या प्राध्यापकांना कामाला लावून सर्व ज्ञान भारतीय भाषात आणले गेले नाही आणि संपर्क भाषा म्हणून हिंदी विकसीत केली गेली नाही. हिंदीभाषिकांच्या अहंकारामुळे विशेषतः दक्षिण भारतीय हिंदी भाषेचे विरोधक बनले. गेल्या ५० वर्षात प्रथम श्रीमंत व उच्च मध्यमवर्गीयांनी इंग्रजी भाषा माध्यम असलेल्या शाळात आपली पाल्ये धाडली आणि आज सर्वच थरात इंग्रजी भाषेतून शिकण्याचे वेड पसरले आहे. ही परिस्थिती असल्यामुळे इंग्रजी भाषा चांगली शिकविली गेली, तरच ती माध्यम म्हणून शाळेत राहिली नाही तरी चालेल, अन्यथा केवळ गरीब व मागासवर्गीयांच्या पाल्यांपुरती मातृभाषा शिक्षणाचे माध्यम राहील आणि इंग्रजीतून शिकलेले व भारतीय भाषांतून शिकलेले, अशी विभागणी कायम राहील. याकरिता मातृभाषा किंवा राज्याची भाषा माध्यम असलेल्या शाळांतील विद्यार्थ्यांना इंग्रजी नीट शिकविले गेले तर त्यांच्या मनात न्यूनगंड निर्माण होणार नाही. यासाठी शिक्षणतज्ज्ञांनी इंग्रजी भाषा कशी व कोणत्या वर्षापासून शिकवावी म्हणजे सर्व विद्यार्थ्यांना किमान पातळीइतके तरी इंग्रजी भाषेचे ज्ञान मिळून आजची भाषेवर आधारित विभागणी दूर होईल हे गंभीरपणे ठरवावे.

भालचंद्र राजे, कल्याण

## अर्थबोधपत्रिकेचे सभासद होण्यासाठी करावयाचा अर्ज

दिनांक :

संपादक, 'अर्थबोधपत्रिका',
भारतीय अर्थविज्ञानवर्धिनी,
'अर्थबोध', ९६८/२१-२२, सेनापती बापट मार्ग, पुणे - ४११ ०१६.

सस्नेह नमस्कार,

मला/आमच्या संस्थेला अर्थबोधपत्रिकेचे सभासद म्हणून अंक क्रमांक ———पासून नोंदवून घ्यावे. पुढील सहा अंकांचे देणगीमूल्य रूपये ५०/- (रु. पन्नास फक्त) डिमांड ड्राफ्टने / मनीऑर्डरने / पोस्टल ऑर्डरने / रोख पाठविण्यात येत आहे. ड्राफ्टचा तपशील पुढील प्रमाणे :

**(फक्त पुण्याच्या बँकेवरील चेक पाठवावेत.)** ________________

अंक पाठविण्यासाठी नाव व पत्ता : ________________

________________

________________

________________

________________ □□□□□□

________________

संबंधित संस्थेचे नाव व पत्ता : ________________

________________

________________

________________ □□□□□□

________________
सही

भारतीय अर्थविज्ञानवर्धिनीतर्फे विविध विषयांवर चर्चासत्रे आयोजित केली जातात. अशा चर्चासत्रात सहभागी होण्याच्या दृष्टीने आपल्या आवडीचे विषय

________________

# सूचना

- चेक / ड्राफ्ट 'इंडियन स्कूल ऑफ पोलिटिकल इकॉनॉमी, पुणे' या नावाने पाठवावेत. **पुण्याच्या बँकेवरीलच चेक मान्य करण्यात येतील.**
- देणगीमूल्य व्यक्ती, संस्था, महाविद्यालये, सार्वजनिक वाचनालये या सर्वांसाठी एकच आहे.
- या नमुना अर्जाच्या झेरॉक्स प्रती किंवा हस्तलिखित प्रतीद्वारे आपण देणगीमूल्य पाठवू शकता.
- आपल्या परिचितांमध्ये अशा प्रती वाटून किंवा आम्हाला त्यांचे पत्ते कळवून आपण, हा अंक अनेक वाचकांपर्यंत पोचविण्यास सहाय्य करू शकता.

**'अर्थबोधपत्रिका' विनामूल्य मिळविण्याची योजना**

अर्थबोधपत्रिकेचे उद्दिष्ट व लेखांचे स्वरूप आपल्याला आवडले असेल तर आपण आम्हाला वाचकवृद्धीसाठी मदत करावी, अशी विनंती करीत आहोत. वाचकवृद्धीच्या या योजनेतून आपल्याला एका वर्षभरातील अंक विनामूल्य मिळू शकतील. त्याचा तपशील खालीलप्रमाणे :

- या योजनेत भाग घेऊ इच्छिणाऱ्या व्यक्तीस एकावेळी कमीत कमी पाच नवीन देणगीदार मिळवून द्यावे लागतील.
- अशी जमा केलेली देणगीमूल्याची रक्कम (कमीत कमी रु. २५०/-) एकत्रितपणे देणगीदारांच्या सभासदत्वाच्या अर्जासहित रोख, डिमांड ड्राफ्ट किंवा मनिऑर्डरने आमच्याकडे पाठवावी लागेल. (या योजनेखाली चेकने रक्कम स्विकारली जाणार नाही)
- अशा रितीने देणगीमूल्य देणारे कमीत कमी पांच नवीन सभासद मिळवून देणारांस 'अर्थबोध' पत्रिकेचे पुढील सहा अंक विनामूल्य पाठविले जातील.
- ही योजना अल्पकाळापुरतीच मर्यादित असून पुरेशी सभासद नोंदणी झाल्यावर कोणतीही पूर्वसूचना न देता ती बंद करण्यात येईल.

# (सं)मोह नको माहितीचा !

*माहितीसंबंधित तंत्रज्ञानाच्या वाढत्या प्रसाराने जगासमोर एक नवीन दालन खुले झाले असून त्याचा लाभ घेण्यासाठी जो तो धडपडतो आहे. दर दिवसागणिक संगणक व इंटरनेट वापरणाऱ्यांची संख्या वाढते आहे. एकविसाव्या शतकात माहितीचे हे जाळे खेड्यापाड्यांपर्यंत पोचविण्याच्या योजना आखण्यात येत आहेत. पण या जाळ्यात अडकल्यानंतरचे दुष्परिणाम भयंकर आहेत, या वस्तुस्थितीबाबत मात्र सर्वत्र अनभिज्ञता आहे. संगणकाच्या व इंटरनेटच्या वाढत्या वापरातून अनेकांना मानसिक आजार होतात व होऊ शकतात, असा निष्कर्ष अमेरिकेतील सिनसिनाटी आणि फ्लोरिडा विद्यापीठातील मानसशास्त्रज्ञांच्या गटाने नुकताच एका अभ्यासाअंती काढला आहे. इंटरनेट वापरणाऱ्या व्यक्तींना प्रत्यक्ष प्रश्न विचारून त्यावर आधारित असा हा पहिलाच अभ्यास आहे.*

*इंटरनेट वापरणाऱ्या बहुतेक व्यक्ती त्याच्या अधीन झालेल्या असतात, असे ह्या गटाला आढळले. ठराविक तास इंटरनेटसमोर घालविल्याशिवाय त्यांना चैनच पडत नाही. काही व्यक्ती तर सलग दोन तीन दिवस संगणकापुढे बसलेल्या असतात. इंटरनेटच्या अतिवापरामुळे त्या व्यक्तींच्या कौटुंबिक, सामाजिक व कार्यालयीन संबंधांवर, कामावर विपरीत परिणाम होतात. या व्यक्ती फार एकाकी होत जातात असे आढळले आहे. काही विशिष्ट कृती सतत करणे (उदा. हातावर हात चोळणे) हा एक प्रकारचा मानसिक आजार असून इंटरनेट वापरणाऱ्या व्यक्तींमध्ये तो बऱ्याच प्रमाणात आढळला. वेळी-अवेळी खाणे व झोपणे यातून निर्माण झालेले आजार, हे इंटरनेटच्या वापरातून होणाऱ्या आजारांमध्ये मोडता येतील अशी परिस्थिती आहे. सतत संगणकासमोर बसल्यामुळे व डोळ्यांवर ताण आल्यामुळे होणारा शारीरिक त्रास वेगळाच. पण या शारीरिक त्रासाचाही परिणाम मानसिक त्रास होण्यात होऊ शकतो. माणसामाणसांमधील संबंध, संवाद याला मुकल्यामुळे एक प्रकारचे नैराश्य येते.*

*इंटरनेटचा वापर भविष्यकाळात वाढणार आहे, हे लक्षात घेऊन मानसशास्त्रज्ञ आता त्याचा आणखी सविस्तर अभ्यास करणार आहेत. इंटरनेट वापरून मानसिक आजार होतात, की मानसिक आजाराचे थोडेफार प्रमाण असणाऱ्या व्यक्तीच इंटरनेट जास्त वापरतात, याचा प्रामुख्याने विचार व्हायला हवा असे मानसशास्त्रज्ञांचे मत आहे.*

*(संदर्भ - 'डाऊन टु अर्थ' - १५ सप्टेंबर २०००.)*

# भारतीय अर्थविज्ञानवर्धिनी

**स्थापना :**

- 'इंडियन स्कूल ऑफ पोलिटिकल इकॉनॉमी' ही संस्था प्रसिध्द अर्थतज्ज्ञ वि. म. दांडेकर यांनी १९७० साली स्थापन केली.

**उद्दिष्टे :**

- भारताच्या सामाजिक, राजकीय, व आर्थिक समस्यांचा अभ्यास व संशोधन करणे;
- अभ्यासक, संशोधक, सामाजिक व राजकीय कार्यकर्ते, शासनकर्ते, उद्योजक, उद्योग व्यवसायातील वरिष्ठ अधिकारी व सामान्य जनता यांना वरील विषयाचे ज्ञान व माहिती देणे;
- इंग्रजी व इतर भारतीय भाषांमध्ये संदर्भित विषयांवरील साहित्य / पत्रके / पुस्तिका योग्य नमुन्यांत तयार करुन प्रकाशित करणे.

**उपक्रम :**

- संस्थेतर्फे १९८९ सालापासून, भारताच्या आर्थिक, सामाजिक, राजकीय विचारांना वाहिलेले एक इंग्रजी त्रैमासिक (जर्नल ऑफ इंडियन स्कूल ऑफ पोलिटिकल इकॉनॉमी) चालवले जाते.
- संस्थेतर्फे वेळोवेळी, विविध विषयांवर अभ्यासशिबिरे, कार्यशाळा, चर्चासत्रे, गटचर्चा यांसारखे कार्यक्रम आयोजित केले जातात.
- अलीकडे, संस्थेतर्फे सर्व सामान्य माहिती विभिन्न वाचकांना देणाऱ्या, वेगवेगळ्या विषयांवरील छोट्या पुस्तिका तयार करून वितरित करण्याचे काम हाती घेण्यात आले आहे.
- नोव्हेंबर १९९८ पासून अर्थबोधपत्रिका प्रकाशित केली जात आहे.

## - संस्थेचे मंडळ -


स. वा. कोगेकर • मृणालदत्त चौधरी • कुमुदिनी दांडेकर

आनंद नाडकर्णी • मनोहर भिडे • नीळकंठ रथ • के. एन्. राज

व्ही. एम्. राव • दि. चं. वधवा • सु. म. विद्वांस

ए. वैद्यनाथन • सत्यरंजन साठे • रामदास होनावर